cmyk

## संपादकीय

### सोळा वर्ष झाले तरी जनजागृती नाहीच!

'पीओपी' गणेश मूर्तीमुळे पर्यावरणाला मोठ्या प्रमाणावर हानी होते आहे व कितीही सूचना, विनंत्या, आवाहने केली तरी अशा मूर्ती बसविण्याचे थांबत नाही. हे लक्षात आल्यावर उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २००८ साली 'पीओपी' गणेश मूर्तीवर बंदी घालून, मूर्ती निर्मिती व विसर्जनाच्या प्रक्रियेबाबत सरकारांनी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर दोन वर्षांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'पीओपी' गणेश मूर्तीबाबतची नियमावली जारी केली. मात्र, या नियमावलीची व बंदीची अंमलबजावणी काही झाली नाही. पुन्हा चार वर्षांनी म्हणजे २०१२ साली खंडपीठाने बंदीचा पुनरुच्चार केला.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com





बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१३५ | गुरूवार दि.०५ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# नुकसानीचा आढावा घेण्यातही ड्रोनचा वापर व्हावा !

## कृषीमंत्री मुंडे यांच्या संशोधकांना सूचना, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा घेतला आढावा

**परभणी । प्रतिनिधी**

**मराठवाड्यातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे कृषि मंत्री धनंजय मुंडे परभणीच्या दौऱ्यावर ४ ऑगस्ट बुधवार रोजी आले होते. यादरम्यान त्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठास भेट देत येथील कार्याचा आढावा घेतला. यावेळी पाऊस आणि त्यामुळे होणारे नुकसान हे नेहमीचेच गणित असून महसूल व कृषी विभागास झालेल्या नुकसानीचे पाहणी अहवाल तयार करून नुकसानीची मदत मिळवून देण्यात बराच वेळ जातो, मात्र नुकसानीची पाहणी आणि नुकसानीचे योग्य अनुमान लावण्यात जर ड्रोन तंत्रज्ञानाची मदत घेतली तर वेळ, मनुष्यबळ दोन्हींची बचत होईल व शिवाय परिणामकारकता अधिक येईल, त्यामुळे फवारणी बरोबरच आता नुकसानीचा आढावा घेण्यातही ड्रोनचा वापर करण्याच्या दृष्टीने योग्य संशोधन व्हावे, अशा सूचना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी यावेळी विद्यापीठ प्रशासनास केल्या.**

विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी कृषि मंत्री धनंजय मुंडे यांचे ऑनलाईन स्वागत केले. तसेच माननीय कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांना प्रतिष्ठित अभियंता पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे मंत्री महोदयांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी विधान परिषद सदस्य मा. श्री राजेश विटेकर, माजी आमदार मा श्री मधुसूदन केंद्रे, निवासी उपजिल्हाधिकारी श्री जीवराज दापकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीमध्ये कृषि मंत्री श्री धनंजय मुंडे यांनी विद्यापीठाने अतिवृष्टीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीचे





रक्षणाकरिता आणि सद्यस्थितीत पीक व्यवस्थापनासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला व पुढे म्हणाले की, विद्यापीठाने विकसित प्रक्षेत्रावर पूर्णतः संगणकीकरण तसेच यांत्रिकीकरण करून स्वयंचलीत शेती विकसित करावी तसेच ड्रोनद्वारे फवारणीबाबत चर्चा करून ड्रोन फवारणीसाठी विद्यापीठाने सध्या आकारलेला दर कमी करावा. ड्रोनचा वापर सध्या नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करण्यासाठी करावा आणि पिकांचे कितपत नुकसान झाले याचा अंदाज द्यावा असे नमूद केले. पिकांच्या उत्पादनामध्ये नॅनो खतांमुळे उत्पादन खर्चात ६० टक्के बचत होईल आणि उत्पादनात ५० % नी वाढ होवू शकते असे नॅनो खतांचे महत्त्व असल्याने नॅनो खताच्या वापरास चालना द्यावी. या विद्यापीठाचे कुलगुरू मा डॉ. इन्द्र मणि हे पिकांच्या पोषक तत्त्वांच्या ड्रोन-आधारित अनुप्रयोगांसाठी, ज्यात नॅनो फॉर्म्युलेशनचा समावेश आहे, यासाठीचे मानक मार्गदर्शक तत्त्वे विकसित करण्यासाठीच्या ड्रोन समितीचे अध्यक्ष असल्याने नॅनो खते मोफत देण्यासाठी शिफारस आणि प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार द्यावा. याबरोबरच पान २ वर

# जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा मिळवून देणार!

## राहुल गांधी यांचा विश्वास



**जम्मू । वृतसंस्था**

**स्वतंत्र भारताच्या इतिहासात एखाद्या राज्याचा असलेला राज्याचा दर्जा काढून घेऊन त्याला केंद्रीय प्रदेश बनविण्याचा प्रयत्न सुरु असून, हा प्रयत्न हाणून पाडू आणि जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा मिळवून देऊ असा विश्वास काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज व्यक्त केला.**

जम्मू आणि काश्मीरमधील विधानसभा निवडणूकीच्या निमित्ताने आयोजित प्रचार सभेत राहुल गांधी बोलत होते. सध्या जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभा निवडणूकीची रणधुमाळी सुरु आहे. त्या निमित्ताने राज्यात एका जिल्ह्यात प्रचारसभा आयोजित करण्यात आली होती. त्या सभेत ते बोलत होते. पुढे बोलताना राहुल गांधी म्हणाले की, जम्मू आणि काश्मीर राज्याचा कारभार प्रशासनाच्या पान २ वर

# आरक्षणाच्या बाबतीत फेक नेरेटीव्ह चालणार नाही!

## मराठा, ओबीसी आमच्या अंगावर घातला म्हणत आ.पंकजा मुंडे कडाडल्या

### महाविकास आघाडीतील पक्षांना विचारला जाब



**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत भाजप महायुतीला मोठा फटका बसला असून विधानसभेत तो फटका बसू नये यासाठी भाजपकडून खबरदारी घेतली जात आहे. मराठा समाजाला भाजपनेच आरक्षण दिले, पण तरीही मराठा समाजाने आरक्षणाच्या मुद्द्यावरुन लोकसभेला आपल्याला नाकारले, कारण विरोधकांनी फेक नेरेटीव्ह पसरवल्याचे भाजपचे वरिष्ठ नेते वारंवार सांगतात. आता, विधानसभा निवडणुकीत विरोधकांचे फेक नेरेटीव्ही खोडून काढायचे मोठे आव्हान असल्याचा मंत्र कार्यकर्त्यांना देत विधानसभा निवडणुकांसाठी कामाला लागण्याचे पान २ वर

**तुम्हीच पक्षाचे सैनिक**

लोकसभेला आपले जे नुकसान झाले ते भरुन काढायचे आहे. म्हणूनच, आपल्यासारख्या छोट्या छोट्या योद्ध्यांना पक्षाने मैदानात उतरवले आहे. आता, पक्षासाठी आपण सर्वांनी जोमाने काम करायला हवे, सेनापती सांगत असतो पण सैनिकाला प्रत्यक्ष लढावे लागते, तुम्ही सैनिक आहात, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी भाजप कार्यकर्त्यांना आपापसातील मतभेद विसरुन पक्षासाठी काम करा, असे आवाहन येथील मेळाव्यातून केले.

### हत्या प्रकरणी अभिनेता दर्शनवर आरोपपत्र दाखल

बंगळूरू: कर्नाटकमधील बहुचर्चित रेणुकास्वामी हत्या प्रकरणी अभिनेता दर्शन थुगुदीपा यांच्यावर बुधवारी (दि.४) बंगळूरु पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले. दर्शन सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

ऑटोचालक रेणुकास्वामी (३३) याचा मृतदेह ९ जून रोजी बेंगळुरूमधील उड्डाणपुलाजवळ मृतावस्थेत आढळला होता. रेणुकास्वामी याचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात झाली होती. या प्रकरणी अभिनेता दर्शन याला जून महिन्यात अटक झाली होती. दर्शनची मैत्रीण पवित्रा गौडा हिला चाहता रेणुकास्वामी

# अखेर एसटी कर्मचाऱ्यांचा संप मागे !

### कर्मचाऱ्यांच्या मुळवेतनात ६ हजार ५०० रुपयांची वाढ



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यभर वेतनवाढीसाठी सुरु असलेला एसटी कर्मचाऱ्यांचा संप अखेर बुधवारी (दि.४) रात्री मागे घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत यावर तोडगा निघाला. या दरम्यान कर्मचाऱ्यांच्या मुळवेतनात ६ हजार ५०० रुपयांची वेतनवाढ करण्यात आली आहे. यांनतर एसटी कृतीसमितीच्या पदाधिकाऱ्यांकडून संप मागे घेण्याचे आवाहन राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना करण्यात आले आहे.

गणेश उत्सवाच्या तोंडावरच एसटी कर्मचाऱ्यांनी संपाची घोषणा केल्यामुळे गावी जाणाऱ्या पान २ वर

# मिठागरांची १५०० एकर जमीन अदानीला देण्याचा डाव

## वर्षा गायकवाड यांचा आरोप, मिठागरांच्या जागेची केली पाहणी

**मुंबई । प्रतिनिधी**

पात्र-अपात्र मान्य नाही, धारावीकरांना धारावीतच घरे मिळाली पाहिजेत, धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या आडून मोदानी सरकार पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील मिठागरांच्या जमिनी फक्त मोदानी आणि कंपनीच्या फायद्यासाठी देत आहे. कांजूरमार्ग येथील २५६ एकर जमीनच नाही तर मुंबईतील मिठागराच्या सर्व जमिनी सरकार




लाडक्या बिल्डर मित्राच्या घशात घालत आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील जवळपास १५०० एकर मिठागरांची जमीन या खास बिल्डरला देण्याचा भाजपा युती सरकारचा पान २ वर

# मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेचा मार्ग मोकळा

## निधी वितरणाला मंजूरी

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य सरकारने महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीला २ हजार ७५० कोटी रुपये देण्यास मंगळवारी मंजूरी दिली आहे. पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजने अंतर्गत पुरवणी मागण्यातून २ हजार ७५० कोटी रुपयांचा निधी तरतूद करण्यात आला होता. त्यानुसार हा निधी वितरणला देण्यास मंजूरी देण्यात आली आहे.**

राज्य सरकार कृषी पंपला सवलतीच्या दरात वीज देत असल्यानं त्यापोटी महावितरण कंपनीला दरवर्षी ७ हजार कोटी अनुदान म्हणून देत होतं. त्यामध्ये आता या योजनेमुळं सात हजार कोटींचा पान २ वर

# रामगिरी महाराजांवर कारवाई करा अन्यथा..

## इम्तियाज जलील यांचा सरकारला अल्टिमेटम

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

रामगिरी महाराज आपण स्वत:ची काळजी घ्या, सरकारला विनंती आहे की त्यांना सुरक्षा द्या. त्यांनी आपल्याच लोकांपासून सुरक्षित रहावे, हे लोक तुमच्या मागे पडू शकतात. आम्ही काही करणार नाही. धमकी नाही फक्त अलर्ट करत आहे असा इशारा एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी सरकारला दिला.

छत्रपती संभाजीनगरमध्ये घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पाच दिवसांनंतर मुंबईकडे कूच करणार आहे, मुस्लिम समाजाने गाड्यांची सोय करून ठेवावी. लवकरच तारीख सांगू, असा अल्टिमेटमच त्यांनी सरकारला दिला. महाविकास आघाडीला आम्ही प्रस्ताव दिला होता आता खूप वेळ झाल्याने आम्ही निर्णय घेतोय असे सूचक पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०४ सप्टेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १२.५० क्विंटल | २,६१० | ३,२८० | २,८११ |
| ज्वारी/हायब्रिड :१२३.०० क्विंटल | २,००० | ३,००१ | २,२७० |
| मूग : १११.०० क्विंटल | ५,९०० | ८,२७५ | ७,५७९ |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : ५६.५० क्विंटल | ७,००१ | ८,००० | ७,५७९ |
| बाजरी:२६.५० क्विंटल | २,००० | २,७०१ | २,४४८ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १९४.५० क्विंटल | ४,५५० | ४,६२५ | ४,५७७ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,७०० | ७,२०० | ६,७०० |

# 'इमर्जन्सी' चित्रपट प्रदर्शित होणार नाही!


## सेन्सॉर प्रमाणपत्र देण्यास मुंबई उच्च न्यायालयाचा नकार ; मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात कोणतेही आदेश पारीत करण्यास मनाई

**मुंबई । प्रतिनिधी**

**काँग्रेस नेत्यांचे आणि पक्षाची प्रतिमा डागळण्याची एकही संधी भाजपाकडून सोडली जात नाही. तसेच भाजपाच्या खासदारांकडून सातत्याने काँग्रेसच्या नेत्यांना लक्ष्य करण्यात येत असते. कधी विद्यमान नेत्यांना तर कधी भूतपूर्व नेत्यांना, या पार्श्वभूमीवर पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या जीवनावर आधारीत आणि आणिबाणी लागू केलेल्या घटनांचा संदर्भावर आधारीत भाजपा खासदार कंगना राणावत यांची प्रमुख भूमिका असलेल्या इमर्जन्सी चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाचे अर्थात सीबीएफसी चे प्रमाणपत्र देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिला.**

मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनला आदेश दिले की, वादग्रस्त चित्रपट इमर्जन्सी चित्रपटाच्या रिलीजवर आक्षेप घेत, जबलपूर शीख संगत किंवा इतर कोणत्याही गटाने किंवा व्यक्तीने केलेले निवेदनाबाबत १८ सप्टेंबरपर्यंत कार्यवाहीच्या अनुषंगाने धोरण ठरवावे असे आदेश दिले. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बर्गेस कुलाबावाला आणि फिरदोश पूनीवाला यांच्या



खंडपीठासमोर यासंदर्भात याचिका सुनावणीसाठी आली होती. या याचिकेवरील सुनावणीवेळी बर्गेस कुलाबावाला यांच्या नेतृत्वाखालील द्विसदस्यीय खंडपीठाने असे मत व्यक्त केले की, सीबीएफसीला चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी किंवा कोणत्याही सुव्यस्थेच्याबाबत निर्णय घेण्याचा कोणताही अधिकार नाही, तथापि, सीबीएफसीला त्वरित जारी करण्यासाठी कोणतेही निर्देश देण्यास नकार दिला. न्यायमूर्तींनी निदर्शनास आणून दिले की मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने ३ सप्टेंबर रोजी दिलेल्या आदेशाद्वारे सीबीएफसीला चित्रपट प्रमाणित करण्यापूर्वी जबलपूर शीख संघाचे प्रतिनिधित्व ठरवण्याचे आदेश दिले होते. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने सीबीएफसीला विशेषत: चित्रपटाला प्रमाणित करण्यापूर्वी जबलपूर शीख संगतीच्या प्रतिनिधींच्या आक्षेपांचा विचार करण्याचे निर्देश दिले आहेत या वस्तुस्थितीनुसार आम्ही पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# सोळा वर्ष झाले तरी जनजागृती नाहीच !

'पीओपी' गणेश मूर्तीमुळे पर्यावरणाला मोठ्या प्रमाणावर हानी होते आहे व कितीही सूचना, विनंत्या, आवाहने केली तरी अशा मूर्ती बसविण्याचे थांबत नाही. हे लक्षात आल्यावर उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २००८ साली 'पीओपी' गणेश मूर्तीवर बंदी घालून, मूर्ती निर्मिती व विसर्जनाच्या प्रक्रियेबाबत सरकारांनी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर दोन वर्षांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'पीओपी' गणेश मूर्तीबाबतची नियमावली जारी केली. मात्र, या नियमावलीची व बंदीची अंमलबजावणी काही झाली नाही. पुन्हा चार वर्षांनी म्हणजे २०१२ साली खंडपीठाने बंदीचा पुनरुच्चार केला. त्यानंतर आठ वर्षांनी म्हणजे २०२० मध्ये उच्च न्यायालयानेही पीओपी मूर्तीवरील बंदी वैध ठरवून या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. सर्वोच्च न्यायालयानेही पीओपी मूर्तीवरील बंदीचे समर्थन करून त्यावर शिक्कामोर्तब केले.

हा सगळा इतिहास उगाळण्याचे प्रयोजन हेच की, सोळा वर्षांनंतरही सरकार व यंत्रणा न्यायालयाच्या या आदेशांची अंमलबजावणी करत नाही की, याबाबत जनतेत प्रयत्नपूर्वक जागरूकता निर्माण करण्याचे गंभीर प्रयत्नही करत नाही कारण मुळात राज्यकर्त्यांना स्वत:लाच प्रदूषणाबाबत फारसे गांभीर्य नाही. उलट उन्मादी उत्साहाला छुपा पाठिंबा देऊन व मदत करून त्यातून आपली मतपेढी जास्तीत जास्त मजबूत करण्याचाच राज्यकर्त्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे प्रदूषणाबाबत छापील पोपटपंचीची भाषणे करणारी नेतेमंडळी पीओपी गणेश मूर्तीची स्थापना करणाऱ्या, डीजेचा दणदणाट करणाऱ्या, लेझर शो करणाऱ्या म्हणजे सर्व तऱ्हेने प्रदूषण करणाऱ्या गणेश मंडळांच्या आरत्यांना, कार्यक्रमाला कधीच नकार देत नाहीत, असा नकार दिला तर त्या गणेश मंडळाकडे जमणाऱ्या हजारोंच्या गर्दीवर आपली छाप टाकण्याची संधी आपण गमावून बसू, अशी भीती नेतेमंडळीला सतावत असते. त्यामुळे गणेशोत्सवात रोज जास्तीत जास्त मंडळांमध्ये उपस्थिती लावून स्वहस्ते आरती पार पाडण्याची स्पर्धाच नेतेमंडळीत लागल्याचे पहायला मिळते. त्यावेळी प्रदूषणाचा मुद्दा पुरता अडगळीत न पडल्यासच नवल. हे सगळे पुन्हा उगाळण्याचे प्रयोजन म्हणजे पुन्हा हा विषय न्यायालयात आला आणि न्यायालयानेही बंदी निर्णयाची अंमलबजावणी करा, असा थेट आदेश न देता यंत्रणांनी या बंदी निर्णयाच्या अंमलबजावणी कायद्यानुसार निर्णय घेतले पाहिजेत, असे सांगितले आहे. आता न्यायालय ज्या यंत्रणांकडून बंदी आदेशाच्या अंमलबजावणीची अपेक्षा व्यक्त करत आहे त्या यंत्रणा काहीच करत नाहीत म्हणून तर पर्यावरणप्रेमी न्यायालयाकडे दाद मागतायत! यंत्रणा तर आदेशांची अंमलबजावणी यावर्षी नको, अशीच विनंती न्यायालयाकडे करतायत! अशा स्थितीत या यंत्रणांना थेट आदेश न देता त्यांच्यावरच कायद्यानुसार निर्णय घेण्याची जबाबदारी न्यायालयाने सोपविली. याचा अर्थ हाच की, आता एखादा निर्णय होण्यासाठीच 'तारीख पे तारीख' प्रकार सोसावा लागतो असे नाही तर न्यायालयाच्या बंदी आदेशाच्या अंमलबजावणीसाठीही 'तारीख पे तारीख' सहन करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. या सगळ्या प्रकारामुळे १६ वर्षांनंतरही पर्यावरणास प्रचंड हानी पोहोचविणाऱ्या पीओपी मूर्तींची स्थापना करणे थांबत नाही की, या मूर्तींचे समुद्रात, नदीत, विहिरीत होणारे विसर्जनही थांबत नाही. विसर्जनाला नदीत वा विहिरीत पाणीच उपलब्ध नसेल तर मग नाइलाजाने यंत्रणेच्या मूर्तीदानाच्या आवाहनाला प्रतिसाद मिळतो. याला महानगरापासून शहरांपर्यंत व खेड्यांपर्यंत कुठल्याच गावाचा अपवाद नाही. अर्थात मागच्या १६ वर्षांत अजिबात जनजागृती झालीच नाही असे नाही. संवेदनशील व विचारी लोकांनी स्वत:पुरती नियमावली पाळण्यास सुरुवात केली आहे. मात्र, या स्वयंजागृतीचे प्रमाण व संख्या खूपच कमी आहे. त्या उलट सरकार व यंत्रणा आपल्या पाठीशी असल्याचे पक्के ठाऊक असल्याने उन्मादी सार्वजनिक उत्सवांत प्रचंड वेगाने वाढ झाली आहे. एवढी की, या उन्मादामुळे अनेकांना जीव गमवावा लागत असल्याच्या बातम्याही आता सामान्य झाल्या आहेत, त्याचे यंत्रणेला तर सोडाच पण उन्माद निर्माण करणाऱ्या व या उन्मादास प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रोत्साहन देणाऱ्यांना काहीच वाटेनासे झाले आहे. अशावेळी सरकार व यंत्रणांनी समाजहितासाठी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे अत्यावश्यक ठरते. मात्र, तिथेच सगळे घोडे पेंड खाते आहे. ज्यांनी नियंत्रकाची भूमिका बजावायची तेच उन्मादी उत्साहाचे केवळ प्रोत्साहनकर्तेच नाही तर प्रायोजक बनले आहेत. विशेष म्हणजे ही बाब केवळ गणेशोत्सवापुरती मर्यादित राहिलेली नाही तर महापुरुषांच्या जयंती उत्सवापर्यंतही हा उन्माद जागोजागी ओथंबून वाहतो आहे. त्यावर विरोधचा आवाज आला की, लगेच धार्मिक, सामाजिक, जातीय अस्मितांची ढाल वापरली जाते.

पर्यावरणवाद्यांना फक्त आम्हीच दिसतो का? हा प्रश्न फेकून विरोधाचा आवाज बंद केला जातो. हे सगळे या थराला पोहोचलेय की, न्यायालयानेही या अस्मिताकरणात न पडण्याचाच विचार केलेला दिसतो आहे. त्यामुळे न्यायालयाने यंत्रणांना त्यांच्या नियंत्रकाच्या जबाबदारीची आठवण करून दिली आहे. दुर्दैवाने आज सर्वच यंत्रणांची एकच जबाबदारी आहे ती म्हणजे सत्ताधाऱ्यांच्या आदेशाचे पालन करणे! सत्ताधाऱ्यांना आपली सत्ता टिकवण्यासाठी जास्तीत जास्त जनाधार टिकवून ठेवायचा आहे. त्यामुळे कठोर निर्णय घेण्याची त्यांची इच्छाशक्तीच नाही. मग असे सत्ताधारी यंत्रणांना त्यांची जबाबदारी काटेकोरपणे पार पाडण्याचे स्वातंत्र्य वा मुभा कसे देतील? हाच प्रश्न! त्यामुळे पीओपी मूर्तीवरील बंदीच्या आदेशाची अंमलबजावणीही आता 'तारीख पे तारीख' मध्येच अडकून पडणार, हेच स्पष्ट होते आहे.

# चोरी झालेले १५६ मोबाईल पोलिसांनी तक्रारदारांना दिले मिळवून

**जालना | प्रतिनिधी**

**जिल्ह्यामध्ये चोरी गेलेल्या मोबाईल पोलिसांनी शोध घेऊन सदरी मोबाईल जप्त करून तक्रारदारांना परत देण्यात आली आहे. चोरीस गेलेल्या मोबाईलचा शोध घेणेकामी संचारसाथी पोर्टल सुरू केले आहे. संचारसाथी पोर्टल अंतर्गत हरवलेल्या/चोरीस गेलेल्या मोबाईलचा शोध घेणेकामी व नागरिकांच्या नांवे असलेले एकूण सिमकार्ड तपासण्यासाठी असे दोन पोर्टल उपलब्ध आहेत. सदर पोर्टलचे सर्व पोलीस ठाणेतील अधिकारी/कर्मचारी यांना हाताळणी प्रशिक्षण देउन जुलै २०२३ पासून सवं पोलीस ठाण्यात कार्यान्वित करण्यात आले होते.**



जालना जिल्हयातील विविध पोलीस ठाणेस चोरीस गेलेल्या/हरवलेल्या मोबाईलच्या नोंद केलेल्या तकारी पोलीसांनी पोर्टलवर अपलोड करून तांत्रिक पद्धतीने मोबाईलचा शोध घेउन मागील ०३ महीन्यात जिल्हयात विविध पोलीस ठाणेस नोंद असलेल्या ३६० तक्रारीमधील एकूण १५६ मोबाईल जे एकूण २१,४०,००० हजार रुपये किंमतीचे मोबाईल आजपर्यंत शोधून काढण्यात जालना जिल्हयातील सायबर पोलीस ठाणेतील पोलीसांना यश आले आहे. त्यामध्ये चोरीस गेलेल्या/हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यात जालना सायबर पोलीस ठाणे आघाडीवर असून जालना सायबर पोलीसांनी तांत्रिक पद्धतीने मोबाईलचा शोध घेउन जिल्हयात विविध पोलीस ठाणेस पोर्टलवर अपलोड असलेल्या ३६० तकारीमधील १५६ मोबाईलचा शोध जालना सायबर पोलीसांनी घेतला असून आज रोजी मा. विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक परिक्षेत्र छ. संभाजीनगर व मा. पोलीस अधिक्षक श्री अजयकुमार बन्सल यांच्या हस्ते तक्रारदार यांना मोबाईल परत करण्यात आले. त्यावेळी हरवलेले मोबाईल परत मिळाल्यामुळे तक्रारदारांनी पोलीसांचे आभार मानून समाधान व्यक्त केले आहे. सदरची कामगिरी ही मा.पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बन्सल , मा. अपर पोलीस अधिक्षक , उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/ गुणाजी शिंदे, पोलीस उपनिरीक्षक / योगेश चव्हाण, सपोउपनि / पाटोळे, पोहवा/ गणेश राठोड, पोहवा/मनोज हिवाळे, पोहवा/सचिन चौधरी, पोहवा/विनोद निकम, पोहवा/सुरज चरावंडे, पोना/ संदीप मांटे, पोना/ विजय खरात, पोकॉ सुधाकर भवर, पोका / दिलीप गुसींगे, पोकों/ गजानन मुरकटे तसेच महीला पोलीस अंमलदार मपोहवा / ज्योती पालवे, मपोहवा/रेणुका नागरे, मपोहवा/ सपना ठाकुर मपोकॉ/ कविता दुनगहु यांनी केली आहे. सर्व नागरिकांना सायबर पोलीस ठाणे, जालना तर्फे आवाहन करण्यात येते की, मोबाईल चोरी झाला किंवा हरवला तर जवळच्या पोलीस ठाणेस तकार नोंद करावी. त्यानंतर स्वतःचे आधारकार्ड व पोलीस ठाणेच्या फिर्यादी प्रतसह या पोर्टलचे कामकाज पाहणाऱ्या संबंधित पोलीस ठाणेच्या अधिकारी व अंमलदागस भेटून आपली फिर्याद पोर्टलवर ऑनलाईन नोंद करावी किंवा सायबर पोलीस ठाण्यात जालना येथे संपर्क करावा.

## सूर्य-चंद्र असेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर निर्मित संविधान राहणार - मुख्यमंत्री

उदगीर । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर निर्मित संविधानामुळेच सर्वसामान्य कुटुंबातील आदिवासी समाजाच्या द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती आणि सामान्य घरातील नरेंद्र मोदी पंतप्रधान पदापर्यंत पोहोचले आहेत. जोपर्यंत आकाशात सूर्य आणि चंद्र आहे तोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर निर्मित भारताचे संविधान राहणार, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. उदगीर येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विश्वशांती बुद्धविहाराचा लोकार्पण सोहळा झाला, यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित या सोहळ्याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री रामदास आठवले, महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन आणि ज्यांच्या पुढाकाराने हे बुद्धविहार उभे राहिले ते राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे मंचावर उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी देशाचे संविधान कोणीही बदलणार नाही, असे म्हणत जोपर्यंत आकाशात सूर्य आणि चंद्र आहे तोपर्यंत भारताचे संविधान राहणार असा विश्वास व्यक्त केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नारीशक्तीचा विकास महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन केले. त्या म्हणाल्या की, महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि आरोग्याच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारने विविध योजना सुरू केल्या आहेत. त्यांचा महिलांनी उपयोग घेऊन स्वत:चा विकास करावा. महिलांचा विकास झाला तर देशाचा विकास होईल. नारीशक्तीचा विकास देशवासियांसाठी महत्त्वाची बाब आहे. कोणत्याही देशाच्या विकासाचा मापदंड हा महिलांचा विकास असला पाहिजे.

## बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील सहाय्यक व्यवस्थापक नीलिमा रामटेके सेवानिवृत्त..!

**बीड | प्रतिनिधी**

**बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील सहाय्यक व्यवस्थापक श्रीमती नीलिमा मनोहर रामटेके यांचा सेवानिवृत्ती पर समारंभ सोहळा अमृत मंगल कार्यालय बीड येथे दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी अतिशय उत्साहात साजरा केला गेला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बीड चे जिल्हाधिकारी तथा बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्राधिकृत अधिकारी समिती चे अध्यक्ष मा. अविनाशजी पाठक साहेब तसेच उपजिल्हाधिकारी शैलेश सुरवसे साहेब बँकेच्या प्राधिकृत अधिकारी समिती चे सदस्य सहायक निबंधक श्री अशोक कदम साहेब, ॲड.अशोक कवडे साहेब**




**भाजपा जिल्हा अध्यक्ष राजेंद्र मस्के साहेब, असेम्बलीज ऑफ गॉड चर्च रेव्ह.सोनवणे पाळक साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती.**

मा. जिल्हाधिकारी साहेबांनी सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमाची एवढे सुंदर आयोजन केल्याबद्दल व बँकेत केलेल्या सेवेबद्दल नीलिमा रामटेके मॅडमचे अतिशय कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अल्फा ओमेगाचे प्रदेश अध्यक्ष आशिष शिंदे व प्राध्यापक दुष्यंता रामटेके यांनी केले. सेवानिवृत्तीचा हा निरोप समारंभ अतिशय आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. यामध्ये स्वागत गीत, गीत गायन, ऑर्केस्ट्रा, लहान मुलींचे डान्स, तबला वादन याचबरोबर उपस्थित मित्र-मैत्रिणीचे मनोगत करण्यात आले. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने उपव्यवस्थापक सौ स्मिता थोरात यांनी नीलिमा रामटेके या बीड जिल्हा बँकेची मुलगीच असून त्या ज्या रीजन्सी पार्क मध्ये राहतात तेथील त्यांच्या सर्व मैत्रिणींकडून या पुढील आयुष्यात नीलिमा ची काळजी घेऊन त्यांना आनंदी ठेवण्याचे भावनिक वचन घेऊन नीलिमा मॅडम चे बँकेतील योगदान आपल्या मनोगतातून व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन बीड जिल्हा बँक कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री संभाजी मस्के, उपव्यवस्थापक सौ. स्मिता थोरात व सहकारी यांनी पाहिले. उपस्थितांच्या शुभेच्छा स्वीकारत अतिशय आनंदात हा सेवानिवृत्ती समारंभ सोहळा पार पडला. या प्रसंगी बँकेचे सर्व अधिकारी कर्मचारी रिजेन्सी पार्क मधील सर्व रहिवासी मित्र मैत्रीण नातेवाईक यांनी उपस्थित राहून रामटेके मॅडम यांना पुढील आयुष्य निरोगी आनंदी आणि भरभराटी चे जाण्यासाठी शुभेच्छा दिल्या .या उत्साहात पार पडलेल्या निरोप समारंभाचे आभार प्रदर्शन रामटेके परिवाराच्या वतीने श्री अभय रामटेके यांनी केले.

## पान १वरून...

### नुकसानीचा आढावा घेण्यातही

सोयाबीन उत्पादनामध्ये सोया मिल्क म्हणून उत्पादित करण्यासाठी भारतीय अन्न सुरक्षिता आणि प्रमाण संस्था, यांच्याकडे पाठपुरावा करावा. याबरोबरच विद्यापीठांमध्ये बांबू लागवडीसाठी चालना देण्यासाठी विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर तसेच रस्त्यालगत बांबूची लागवड करावी अशा सूचना दिल्या. यावेळी कुलगुरू मा डॉ. इन्द्र मणि यांनी बिजोत्पादनासाठी विद्यापीठाने साडेतीन हजार एकर जमीन विकसित केल्याचे तसेच महाराष्ट्र मेकॅनायझेशन सेंटर बाबत माहिती दिली. संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी विद्यापीठाचे बीजोत्पादन मागील वर्षी १०२०० क्विंटल झाले होते. यावर्षी हे लक्ष दुपटीने करून २०००० क्विंटलवर नेहण्यात येईल व भविष्यात ५०००० क्विंटलचे लक्ष निर्धारित केल्याचे सांगितले तसेच विद्यापीठाने शेतकऱ्यांच्या विकासासाठी तसेच शैक्षणिक विकासासाठी विद्यापीठाने विदेशातील व देशातील अग्रगण्यश विद्यापीठे व संस्थेचसोबत सामंजस्य करार केले असुन याचा लाभ कुशल मनुष्यिबळ निर्मिती करण्यास होणार असल्याचे नमूद केले. तसेच विद्यापीठ शेतकरी केंद्रित कार्य करत असून नियमित विस्तार कार्या बरोबरच दर मंगळवारी आणि शुक्रवारी सायंकाळी सात वाजता ऑनलाईन शेतकरी शास्त्रज्ञ संवाद घडवून आणला जातो. याबरोबरच प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू पासून ते विद्यापीठाच्या सर्व कार्यालयातील अधिकारी शेतकऱ्यांसाठी ''माझा एक दिवस माझ्या बळीराजा सोबत'' हा विशेष उपक्रम राबवत आहेत असे सांगितले. कुलसचिव डॉ. संतोष वेणीकर यांनी विद्यापीठाचा महसूल वाढ होण्याच्या दृष्टीने बीजोत्पादन प्रकल्प, उती संवर्धित केळी आणि उसांच्या रोपांना मागणी असल्याने या प्रकल्पांना मंजूर देण्याची विनंती केली. यावेळी नियंत्रक प्रवीण निर्मळ, विद्यापीठ अभियंता दीपक कशाळकर, सहयोगी अधिष्ठाता डॉ सय्यद इस्माईल, डॉ. जया बंगाळे, डॉ. आर डी क्षीरसागर, डॉ. वासुदेव नारखेडे, डॉ. राजेश कदम, डॉ. विश्वनाथ खंदारे, डॉ. गजेंद्र लोंढे, लातूर विभागाचे कृषि सहसंचालक श्री साहेबराव दिवेकर तसेच विविध विभागाचे विभाग प्रमुख, विद्यापीठातील प्रमुख शास्त्रज्ञ आदींची उपस्थिती होती.

----------

### आरक्षणाच्या बाबतीत फेक

आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले. भाजप आमदार पंकजा मुंडे यांनी पुण्यातील मेळाव्यातून कार्यकर्त्यांना आवाहन केले. यावेळी, आरक्षणाच्या मुद्द्यावरुन फेक नेरेटीव्ह पसरवणाऱ्या राष्ट्रवादीला तुम्ही सवाल विचारा, तुमची भूमिका काय, असा प्रश्न विचारण्याचे पंकजा यांनी म्हटले. तसेच, बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर, हा सूर्य हा जयद्रथ असल्याचेही पंकजा यांनी म्हटले. आता आरक्षणाच्या बाबतीतील फेक नेरेटीव्ह चालणार नाही, तुम्ही आमच्या पक्षावर बोलतात, मग तुमची भूमिका काय, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या पक्षाला त्यांनी सवाल केले. तसेच, तुम्ही आपल्या विरोधात असलेल्या राष्ट्रवादीला विचारा, तुमचे म्हणणे आहे का ओबीसीतून आरक्षण दिले पाहिजे. सगळेच तुम्ही आमच्यावर घालतात, आमच्याच अंगावर ओबीसी समाज घालता, मराठा समाज आमच्या अंगावर घालता, आमच्याच अंगावर दलित बांधवांना घालतात, जणू काही आपण दुसऱ्या देशातून आलो आहेत आणि येथील राजकारण उद्‌ध्वस्त करायला निघालोय, अशा शब्दात पंकजा मुंडे यांनी पुण्यातील वडगाव शेरी येथील भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात आरक्षणाच्या मुद्द्यावरुन शरद पवारांच्या राष्ट्रवादीला लक्ष्य केले.

-------

### जम्मू आणि काश्मीरला

माध्यमातून चालविण्यात येत आहे. येथील पैसा-अडका, रोजगाराच्या संधी जम्मू आणि काश्मीरच्या नागरिकांना देण्यात येत नाही. तर येथे बाहेरून आलेल्यांना ती संधी देण्यात येत आहे. या गोष्टी आता आम्ही घडू देणार नाही असेही यावेळी सांगितले. राहुल गांधी पुढे बोलताना म्हणाले की, जम्मू आणि काश्मीरमध्ये आता इंडिया आघाडीचे सरकार येणार आहे. त्यामुळे जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा मिळवून देण्यासाठी रस्त्यावरून ते विधानसभेत आणि विधानसभेतून थेट संसदेपर्यंत काढून घेण्यात आलेल्या राज्याचा दर्जा परत मिळवून देण्यासाठी लढाई पूर्ण ताकदीने लढू असा इशाराही यावेळी भाजपाला यावेळी दिला. शेवटी बोलताना राहुल गांधी म्हणाले की, भाजपाने काहीही करू द्या, पण राज्याच्या सत्तेवर येणारी इंडिया आघाडी जम्मू आणि काश्मीरला पुन्हा एकदा राज्याचा दर्जा मिळवून देत येथील जनतेचे असलेले अधिकार आणि सन्मान मिळवून देणार असा विश्वासही यावेळी स्थानिकांना दिला.

--------

### मुख्यमंत्री बळीराजा मोफत

भार राज्य सरकारवर पडणार आहे. यंदा या अनुदानाची ५ हजार ६८५ कोटी आणि पुरवणी मागणीतील २ हजार ७५० कोटी अशी एकूण ८ हजार ४३४ कोटी इतकी तरतूद महावितरण कंपनीसाठी करण्यात आली आहे. म्हणजे शेतकऱ्यांना मोफत वीज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेत शेतकऱ्यांना पाच वर्ष मोफत वीज देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. राज्यातील ७.५ एचपी कृषीपंप वापरणाऱ्या ४४ लाख ३ हजार शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे. त्यासोबतच ७.५ एचपीपेक्षा कमी क्षमतेचा कृषीपंप असणाऱ्या शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यात येणार आहे. एप्रिल २०२४ पासून या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. म्हणजेच २०२४ ते २०२९ पर्यंत शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे. २५ जुलै २०२४ च्या शासन निर्णयानुसार प्रतिवर्षी एकूण १४ हजार ७६० कोटी रुपयांचा खर्च या योजनेवर करण्यात येणार आहे. १ एप्रिल २०२४ पासूनच राज्य सरकार या योजनेची अंमलबजावणी करणार आहे. त्यामुळे त्यापूर्वी थकबाकी माफ होणार की, नाही हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. कारण मुख्यमंत्री शिंदे यांनी या योजनेत मोफत वीज देत आहोत, मग थकबाकी वसूल करणार नाहीत, असं जाहीर केलं होतं. पण त्याबद्दलचा निर्णय मात्र गुलदस्त्यात आहे. परिणामी थकबाकीदार शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे. तर दुसरीकडे महावितरण कंपनी शेतकऱ्यांचा जादाचा वीज वापर दाखवून दाखवून राज्य सरकारला लुबाडत आहे, असा आरोप महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष वीजतज्ञ प्रताप होगाडे यांनी केला आहे. होगाडे म्हणाले, '' ६० ते ६५ युनिट्स द्यायची आणि दरमहा सरासरी १२५ युनिट्स प्रतिएचपीप्रमाणे बिलिंग करायचे, त्यामुळे राज्य सरकारकडून १२५ युनिट्सची सबसिडी दिली जाते. याचा अर्थ सरकारकडून दुप्पट सबसिडी लाटायची आणि प्रत्यक्ष दिलेल्या विजेच्या किमतीपेक्षा जास्त रक्कम सबसिडीमधून जमा करायची आणि पुन्हा शेतकऱ्यांच्या डोक्यावर दुप्पट बिलांचा आणि थकबाकीचा बोजा लादायचा, हा धंदा राजरोसपणे महावितरण कंपनी करतेय. कंपनी आपल्या फायद्यासाठी आणि गळती लपविण्यासाठी शेतकऱ्यांना बदनाम करतेय आणि त्याचबरोबर राज्य सरकारची म्हणजे जनतेचीच लूट करतेय,'' असेही होगाडे म्हणाले.

**योजना निवडणूक जूमला ठरू नये...**

वास्तवात बळीराजा मोफत वीज योजनेची पाच वर्ष राबवण्याचा शासन निर्णय असला तरीही त्याच शासन निर्णयात या योजनेचा ३ वर्षानंतर आढावा घेण्यात येईल आणि त्यानंतर पुढील काळात योजना सुरू ठेवायची की, नाही याबद्दल निर्णय घेण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. त्यामुळे शासन निर्णयाचे चक्र वेगाने फिरू लागली आहेत. पण निवडणुकीनंतर या योजना म्हणजे निवडणुक जुमला ठरू नयेत, अशीच शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

--------

### मिठागरांची १५०० एकर

डाव आहे, असा आरोप मुंबई काँग्रेस अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड यांनी केला. मुंबई काँग्रेस अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड यांनी कांजूरमार्ग येथील प्रस्तावित कारशेड जवळच्या मिठागरांच्या जागेची वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली. यावेळी बोलताना प्रा. वर्षा गायकवाड पुढे म्हणाल्या की, मुंबईकरांचे हक्क मारायचे, मुंबईचे महत्त्व कमी करायचे आणि मुंबईकरांच्या हक्काच्या जागा बळकवायच्या हा मोदानी अँड कंपनीचा एकमेव अजेंडा आहे. मोदानी अँड कंपनीला संपूर्ण मुंबई गिळायची आहे आणि त्यासाठी हे महाभ्रष्ट भाजपा सरकार वाट्टेल त्या थराला जात आहे. हा कोट्यवधी रुपयांचा घोटाळा असून पर्यावरणदृष्ट्या मुंबईला याचे भयंकर परिणाम सोसावे लागणार आहेत. मुंबईकरांचा विरोध असताना टेंडरमध्ये सोयीस्करपणे बदल करून अदानीला धारावीची जागा दिली आणि नंतर धारावी पुनर्विकासाच्या आडून मुंबईतील जवळपास १५०० एकर जागा अदानींच्या आणि विकासक मित्रांच्या घशात घातली. हे होत असताना आता अजून एक हजार कोटी रुपयांचा महाघोटाळा मोदानी अँड कंपनीने केल्याचा आरोपही यावेळी केला. पुढे बोलताना वर्षा गायकवाड म्हणाल्या की, 'अपात्र' धारावीकरांसाठी घरे देण्याच्या नावाखाली मोदीनीला जमीन दिली जात आहे पण आम्हाला पात्र-अपात्र मान्य नाही. प्रत्येक धारावीकराने, आपल्या रक्त आणि घामाने धारावी उभी केली आहे, त्यामुळे पात्र-अपात्रचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सर्व धारावीकरांना धारावी मध्येच घरे मिळाली पाहिजेत ही आमची भूमिका आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे नाव घेऊन प्रचंड प्रमाणात भूखंड बळकावण्याचे हे मोठे कारस्थान आहे. हा विकास नाही तर मुंबईकरांची लूट आहे. मुंबईचे भविष्य हे विक्रीसाठी नाही हे लक्षात ठेवा असा इशाराही यावेळी दिला.

**मुंबईत पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मिठागरे महत्त्वाची**

शेवटी बोलताना वर्षा गायकवाड म्हणाल्या की, मुंबईत पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व पूर परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मिठागरे महत्त्वाची भूमिका बजावतात. ही मिठागरे दर पावसाळ्यात कोट्यवधी लीटर पाणी आपल्या पोटात साठवतात. मुंबईकरांना पुराचा फटका बसण्यापासून वाचवतात. तेव्हा मिठागरांच्या जमिनीवर भराव घालून तिथे इमारती उभारल्या, तर शहराला भयंकर पुराचा धोका संभवतो. पर्यावरणदृष्ट्या, खारफुटी जमिनींवर सरसकट बांधकाम परवानगी देण्याचे भयंकर परिणाम होणार आणि असे करणे पर्यावरण व संरक्षण कायद्याच्याही विरोधात असल्याचेही यावेळी सांगितले.

-------------

### रामगिरी महाराजांवर

वक्तव्यही त्यांनी केले. राज्यात रामगिरी महाराज यांनी मुस्लिमांच्या भावना दुखावणारे विधान केल्यानंतर मोठा वादंग माजला होता. यावर इम्तियाज जलील यांनी केलेल्या वक्तव्यामुळे खळबळ माजली आहे. दरम्यान, यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह सरकारवर जोरदार टीका केली. वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप असलेल्या रामगिरी महाराज यांच्यावर गुन्हे दाखल होऊन देखील कारवाई होत नसल्याने एमआयएमचे नेते इम्तियाज जलाल यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र सरकारला आम्ही पाच दिवसांचा वेळ देतो, रामगिरी महाराज यांच्यावर कारवाई करा अन्यथा मी आतापर्यंतची सर्वात मोठी रॅली घेऊन मुंबईला येणार असल्याचा इशारा जलील यांनी दिला आहे. संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

**मुख्यमंत्री टपोरी नेत्यासारखं बोलले**

जलील म्हणाले, मुख्यमंत्री टपोरी नेत्यांसारख बोलले. रामगिरी महाराज यांच्या केसालाही धक्का लावू देणार नाही. रामगिरी महाराज यांच्यावर देशभरात ५८ गुन्हे दाखल झाले असून, तीन दिवसांपूर्वीचा हा आकडा आहे. लोकांचा रोष असल्याने हे गुन्हे दाखल होत आहे, पण कारवाई होत नाही. पोलिसांचे हात बांधलेले आहेत, आपली गडचिरोलीला बदली होईल अशी पोलिसांना भीती आहे. नितेश राणे सारखे चिल्ले पिल्ले फडणवीस यांनी सोडले आहेत. वर्दीतील पोलीस म्हणजे आरएसएस चे आणि एकनाथ शिंदे यांचे कार्यकर्ते आहेत. असेही जलील म्हणाले.

---------

### अखेर एसटी कर्मचाऱ्यांचा

भक्तांना मोठे संकट निर्माण झाले होते. गणेश उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या सर्व प्रवाशांना एसटीने संप मागे घेतल्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे आजपासून संप मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच एसटी वेतनवाढ कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना ड्युटीवर जाण्याचे आवाहन केले आहे.

----------

### हत्या प्रकरणी अभिनेता दर्शनवर

याने आक्षेपार्ह मेसेज पाठवले होते. त्यामुळे संतापलेल्या दर्शनने रेणुकास्वामी याची सुपारी देवून हत्या केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी या प्रकरणी दर्शन आणि पवित्रा गौडासह १५ जणांना अटक केली आहे. रेणुकास्वामीच्या शवविच्छेदन अहवालात इलेक्ट्रिक शॉक देवून छळ करुन त्याची हत्या करण्यात आल्याचे म्हटले आहे. पोलिसांनी या प्रकरणात २०० हून अधिक परिस्थितीजन्य पुरावे गोळा केले आहेत. यामध्ये दर्शन आणि इतर आरोपींच्या कपड्यांवर रक्ताचे डाग असल्याच्या फॉरेन्सिक अहवालांचा समावेश आहे.

-----------

### 'इमर्जन्सी' चित्रपट

कोणतेही दिशानिर्देश देऊ शकत नाही. जर आम्ही सीबीएफसीला प्रमाणपत्र जारी करण्याचे निर्देश दिले तर, आम्ही डिव्हिजन बेंचच्या निर्देशांचे उल्लंघन होईल, असे आदेश दिले जाऊ नयेत म्हणून आम्ही सीबीएफसीला याचिकाकर्त्याने मागितलेले प्रमाणपत्र देण्यास असमर्थ आहोत सीबीएफसीला १८ सप्टेंबरपर्यंत आक्षेप असल्यास त्यावर विचार करण्याचे निर्देश द्या, असेही यावेळी खंडपीठाने आदेशात नमूद केले. इमर्जन्सी चित्रपटाचे सह-निर्माते झी स्टुडिओजने दाखल केलेल्या याचिकेवर खंडपीठ सुनावणी घेण्यात येत होती. ज्यामध्ये हिमाचल प्रदेशातील मंडी येथील खासदार कंगना राणावत यांची भूमिका आहे. ''चित्रपटाच्या विरोधात असलेल्या वातावरणाचे कारण देत सीबीएफसीने आमचे प्रमाणपत्र रोखून ठेवले आहे. काही गटांनी फक्त ट्रायल पाहून आमच्या चित्रपटावर आक्षेप घेतला. सीबीएफसी हे सेन्सॉर बोर्ड आहे आणि त्याचा कायदा आणि सुव्यवस्थेशी काहीही संबंध नाही. ते राज्यासाठी आहे. निर्णय घ्या आणि काळजी घ्या,'' झी स्टुडिओचे प्रतिनिधीत्व करणारे वरिष्ठ वकील व्यंकटेश धोंड यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना मुद्दा उपस्थित केला. सादरीकरणाशी सहमती दर्शवत न्यायमूर्ती कोलाबवाला म्हणाले, ''श्री धोंड पाहा, आम्ही तुमच्यासोबत आहोत. या गटांना हे कसे समजले की हा चित्रपट काही समाजासाठी आक्षेपार्ह आहे हे चित्रपट न पाहताच. मी स्वतःसाठी बोलतो (जे कोलाबवाला) सीबीएफसीने प्रतिनिधित्व, अशांतता इत्यादींच्या मुद्द्यावर जाण्याचा अधिकार नाही. आमच्या सरन्यायाधीशांनी आदेश पारित केला आहे की काही कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीमुळे चित्रपट प्रदर्शित होण्यापासून रोखता येणार नाही. निर्मात्यांच्या वादाला तोंड देताना, सीबीएफसी वकील डॉ.अभिनव चंद्रचूड यांनी असा युक्तिवाद केला की निर्मात्यांनी ज्या ईमेलवर विश्वास ठेवला आहे तो ''सिस्टम-जनरेट'' होता आणि बोर्डाच्या अध्यक्षांच्या स्वाक्षरीनंतरच प्रमाणपत्र जारी केले जाते.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. ५ सप्टेंबर २०२४



## अनोखा गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी अनिल गोयल

जालना (प्रतिनिधी) गणेशोत्सवात आपली वेगळी प्रतिमा निर्माण केलेल्या जालना शहरातील प्रतिष्ठीत, महाराष्ट्रात ख्याती प्राप्त असलेल्या श्री .अनोखा गणेश मंडळ आयोजित गणेशोत्सव -२०२४ च्या अध्यक्षपदी कालिंका स्टीलचे संचालक, उद्योजक अनिल गोयल आणि ऑल इंडिया स्टील असोसिएशनचे अध्यक्ष तथा वरद फर्टीलायझर्सचे संचालक योगेश मानधना यांची फेर निवड करण्यात आली आहे.



श्री.अनोखाचे संस्थापक अध्यक्ष अजय (जगदीश) भारतिया यांच्या अध्यक्षतेखाली नूतन कार्यकारिणी निवडीसाठी बुधवारी ( ता.०४) छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील मंडळाच्या कार्यालयात बैठक घेण्यात आली. मंडळाचे कार्याध्यक्ष संजय अग्रवाल ( रूपम) यांच्यासह सदस्यांची यावेळी उपस्थिती होती. गणेशोत्सवात आपले वेगळेपण जपलेल्या अनोखा गणेश मंडळातर्फे गतवर्षी, १०८ किलो वजन असलेली बाप्पांची अद्भुत मूर्ती साकारली, मुर्तीस सुवर्णजडीत सुशोभित करण्यासह नयनरम्य देखावा जालनेकर भाविकांना पहावयास मिळेल, अभूतपूर्व आणि ऐतिहासिक असा गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला असून त्या अनुषंगाने बैठकीत नियोजन करण्यात आल्याचे संस्थापक अजय ( जगदीश) भरतीया यांनी सांगितले. सर्वानुमते अध्यक्षपदी अनिल गोयल आणि योगेश मानधना यांची निवड करण्यात आली. मंडळाची उर्वरित कार्यकारिणी लवकरच जाहीर केली जाईल. असे मंडळाचे संस्थापक अजय (जगदीश) भारतिया कार्याध्यक्ष संजय अग्रवाल ( रूपम) यांच्यासह सदस्यांनी कळविले आहे.

# अनमोल वाणी व प्रभावी लेखणीच्या माध्यमातून आणाभाऊंनी वंचितांच्या व्यथा मांडल्या - डॉ. शेटे

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

दीड दिवस शाळेत जाऊन ३५ कादंबऱ्या, १५ कथा संग्रह, ३५ पटकथा, दहा पोवाडे, अनेक चित्रपट कथा, प्रवासवर्णन आदी विपुल साहित्य निर्माण करणारे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे खऱ्या अर्थाने साहित्यसम्राट होते. आपल्या अनमोल वाणी व प्रभावी लेखणी च्या माध्यमातून त्यांनी वंचितांच्या व्यथा मांडल्या असल्याचे प्रतिपादन डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले. दिंद्रूड ता.माजलगाव येथे आयोजित आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. दरम्यान साठे जयंतीनिमित्त दिंद्रुड पोलिस स्टेशनच्या वतीने महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सपोनि अण्णाराव खोडेवाड व बाबा कांबळे यांनी समाजातील सर्व घटकातील लोकांना सोबत घेऊन राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमांचे कौतुक होत आहे.

सत्यशोधक डॉ.आण्णाभाऊ साठे यांचा जयंती महोत्सव दिंद्रुड येथील जुने बस स्थानक येथे पार पडला. लोकशाहीर आण्णाभाऊ साठेंच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे होते. यावेळी भाजपा नेते रमेश आडसकर, सपोनि अण्णाराव खोडेवाड, रमेश गालफाडे, भास्कर शिंदे, दीपक थोरात, अमोल शेरकर, नवनाथ कांबळे, बाबासाहेब थोरात आदि राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्राचे प्रसिद्ध गायक चंदन कांबळे व गायिका राणी मस्के यांचा समाज प्रबोधनावर बहारदार गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी अध्यक्षीय भाषणात बोलताना डॉ. ओमप्रकाश शेटे म्हणाले की, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची लोकप्रिय फकीरा ही कादंबरी त्यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अर्पण केली होती. ती २५ भाषात भाषांतरित झाली. तिला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. छत्रपती शिवाजी महाराजांवर भारताबाहेर (रशियामध्ये) पोवाडा गाणारे आण्णाभाऊ साठे हे एकमेव शाहीर असल्याचेही शेटे यांनी भाषणात आवर्जुन सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांची समायोजित भाषणे झाली. सपोनि अण्णाराव खोडेवाड यांनी आपल्या खास शैलीत बहारदार गीत सादर केले. जयंती उत्सवाचे आयोजक बाबा कांबळे, जयंती उत्सव समिती अध्यक्ष सिद्धेश्वर ठोंबरे, अध्यक्ष शिवहार कटारे, अंगद तांबे, नाना देशमाने, राजू मेंडके, अक्षय सोनवणे,अक्षय चांदबोधले, बाबू कांबळे, महेश लोखंडे, परशुराम लोखंडे यांच्यासह जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा.अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके व सहाय्यक पोलीस अधीक्षक डॉ. धीरज कुमार यांच्या मार्गदर्शनाख़ाली दिंद्रुड पोलीस स्टेशनचे स.पो.नि. अण्णाराव खोडेवाड यांनी पोलीस स्टेशनमध्ये महा रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. शिबीर यशस्वी करण्यासाठी पो.उप.ज्ञानेश्वर धोत्रे, पोलीस कर्मचारी नंदू वाघमारे, श्रीपती चौरे,बालाजी सुरेवाड, युवराज श्रीडोळे, महेश साळुंके आदीनी परिश्रम घेतले. वैद्यनाथ ब्लड बँकेचे बिभीषण सांगळे, योगेश सांगळे, संतोष चोले, गोपीनाथ सांगळे, अस्लम शेख,गायत्री काळे,भाविका गाटे,भाग्यश्री दहारे,अश्विनी खराडे यांनी रक्त संकलन करण्यासाठी मेहनत घेतली.



**दिंद्रुड येथे आगळीवेगळी व सर्व समावेशक जयंती साजरी**

### १०४ रक्तदात्यांचे रक्तदान...

दिंद्रुड पोलीस स्टेशन येथे कर्तव्यावर असलेले पीएसआय कै.मच्छिंद्र नन्नवरे व सिरसाळा येथील पोलीस कै. पंडित खोडवे यांचे अकस्मात निधन झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ व सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधत दिंद्रुड पोलिसांच्या वतीने रक्तदान महाशिबिर घेण्यात आले. या रक्तदान शिबिरामध्ये परिसरातील १०४ रक्तदात्यांनी रक्तदान करून मोठ्या आनंदात आपला सहभाग नोंदवला. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना केवळ सामाजिक बांधिलकी म्हणून या ठिकाणी केलेले रक्त संकलन सर्वसामान्य व गरजू रुग्णांच्या कामी येईल यातच खरा आनंद असल्याचे सपोनि खोडेवाड म्हणाले.

## भाजप तर्फे ऑनलाईन घरगुती गणपती सजावट स्पर्धा-राजेश राऊत

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या वतीने जालना शहरवासीयांसाठी '' संकल्प पर्यावरण संवर्धनाचा..., ईकोफ्रेंडली उत्सव लाडक्या विघ्नहर्त्याचा '' या संकल्पनेवर आधारित ऑनलाईन घरगुती गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती माजी उपनगराध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाचे प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत यांनी बुधवारी ( ता. ०४) दिली. पर्यावरण पूरक गणेशोत्सवात जालनेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन ही राजेश राऊत यांनी केले आहे.



दरवर्षी सर्वत्र जल्लोषपुर्ण व उत्साही वातावरणात साजरा होत असलेल्या गणेशोत्सवात पर्यावरण पूरक उत्सवाची संकल्पना घेऊन गणेश भक्तांचा उत्साह द्विगुणित करावा, याच उद्देशाने सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. असे राजेश राऊत यांनी स्पष्ट केले.

सदरील स्पर्धा ही जालना शहरवासीयांसाठी खुल्या स्वरूपात असून स्पर्धेत सहभागी होणाऱ्या श्री भक्तांनी आपल्या घरातील गणपती बाप्पांची मुर्ती व सजावटीचे नकाशा प्रमाणीत ( जिओ टॅग) मुर्ती जवळ उभे राहून काढलेले छायाचित्र व ०१ मिनीटांचा भ्रमणध्वनीत शुटींग केलेला व्हिडिओ चलभाष क्रमांक ९४२२२१८०८६,,९८२२७८७८४२, ९९२१४८५०१८,९९२३१५६५५५ या व्हाट्सऍप क्रमांकावर दि. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत पाठवावेत.तज्ञ परीक्षकांमार्फत परिक्षण करून स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात येईल. उत्कृष्ट सजावटीसाठी प्रथम ०५ हजार,द्वितीय ०३ हजार,तृतीय ०२ हजार ,उत्तेजनार्थ १,००० रु. ची ०२ रोख पारितोषिके व स्मृती चिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव करण्यात येईल. तरी पर्यावरण पूरक गणेशोत्सवाच्या चळवळीत जालनेकरांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन राजेश राऊत यांनी केले आहे.

## मसरत सुलताना अन्सारी यांना पुरस्कार जाहीर

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्रात कदाचित पहिल्यांदाच फक्त अल्पसंख्यांक समाजातील गुणवंत शिक्षकांचा ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी, शिक्षण महर्षी, मुस्लिम समाजातील पहिले आणि भारताचे तिसरे राष्ट्रपती डॉ. जाकेर हुसैन या आदर्श व्यक्तिमत्त्वाच्या नावाने मान्यवरांच्या उपस्थितीत गुरुवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी आदर्श शिक्षक म्हणून अल्पसंख्याक समाजातील गुणवंत शिक्षकांना सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यातून गुणवंत शिक्षकांची निवड केली असल्याचे आयोजक वैभव स्वामी, संपादक दैनिक समर्थ राजयोग आणि पत्रकार शेख आयेशा, अध्यक्ष आश्रय सेवा केंद्र यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉक्टर राधाकृष्णन सर्वपल्ली यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून ५ सप्टेंबर रोजी सर्वत्र शिक्षक दिन साजरा केला जातो. या निमित्ताने शासन आणि प्रशासनाच्या वतीने आदर्श शिक्षकांना दरवर्षी जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, आणि राष्ट्रपती स्तरावर गौरवले जाते. विविध संस्था,पक्ष यांच्या वतीने गुणवंत शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करतात. मात्र कदाचित महाराष्ट्रामध्ये आज पर्यंत फक्त अल्पसंख्यांक समाजातील आदर्श शिक्षकांचा गुणगौरव सोहळा झालेला नसावा, ही बाब लक्षात घेऊन दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी शिक्षण महर्षी, लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यांच्या शुभहस्ते अल्पसंख्याक समाजातील गुणवंत शिक्षिका श्रीमती. मसरत सुलताना अन्सारी यांना डॉ. जाकेर हुसैन आदर्श शिक्षक या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यावर्षी पहिल्यांदाच या पुरस्काराचे वितरण होणार असून या अनोख्या पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा तथा साप्ताहिक शिववाणीच्या संपादक शेख आयेशा यांनी केले आहे. यावर्षीपासून पहिल्यांदाच आदर्श शिक्षक पुरस्काराचे नियोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या पहिल्या वर्षी बीड शहरातील मिलिया प्राथमिक मुलींची शाळा भालदारपुरा बीड, या शाळेतील सहशिक्षिका मसरत सुलताना अन्सारी डॉ.जाकिर हुसैन आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी ठरल्या आहेत. पुरस्कारार्थीना शिक्षक दिनी मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल मसरत सुलताना अन्सारी, यांचा सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# नैतिक मुल्यांची जोपासना हेच खरे पालकत्व-डॉ.शुभदाताई लोहिया

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील प्रसिद्ध अशा समुपदेशक डॉ.मयुरी श्रीनिवास धायगुडे यांनी स्वतः मातृत्वाच्या कळा अनुभवल्यानंतर आणि तो अनुभव इतर समकालिन पालकांना समजता यावा आणि त्यातून त्यांचा पुढचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी सार्थ पालकत्व हे पुस्तक उदयास आले आहे. या पुस्तकाचा प्रकाश सोहळा शुक्रवार दि. ३० ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत स्व.विलासराव देशमुख सभागृह नगर परिषद अंबाजोगाई या ठिकाणी पार पडला. यावेळी डॉ.शुभदा लोहिया यांनी या पुस्तकाचे कौतुक करुन नैतिक मुल्यांची जोपासना हेच खरे पालकत्व असल्याचे मत व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार तथा विश्लेषक अमर हबीब हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून अंबाजोगाई येथील प्रसिद्ध अशा शल्यचिकित्सक व वैद्यकिय समुपदेशक डॉ.शुभदा लोहिया व स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचे प्रा.डॉ.शैलेजा बरुरे या होत्या. प्रमुख उपस्थितीमध्ये स्वाराती रुग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ.सिध्देश्वर बिराजदार, जेष्ठ नागरिक संघाच्या माजी अध्यक्षा सौ.कमलाताई बरुरे , जेष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, मसाप अंबाजोगाई शाखेचे उपाध्यक्ष डॉ.राहुल धाकडे, अनुराग पुस्तकालयाचे संचालक अभिजित जोंधळे, दीनदयाळ बँकेचे चेअरमन ॲड.मकरंद पत्की, अंकुर सेवाभावी संस्थेच्या अनिता कांबळे, सेवानिवृत्त शिक्षिका सौ.दिपा दिलीप स्वामी, अंतरभारतीचे अध्यक्ष दत्ता वालेकर यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन पार पडले. सार्थ पालकत्व हे पुस्तक म्हणजे प्रचलित परिस्थितीला अनुसरुन केलेले कथन आणि त्यातून नव्या पिढीला दिला जाणारा संदेश व मार्गदर्शक म्हणून पुढे आले आहे. या प्रसंगी प्रमुख अतिथी डॉ.शुभदाताई लोहिया म्हणाल्या की, डॉ.मयुरी धायगुडे यांना ही संकल्पना सुचने म्हणजे त्याच्यातील खरे पालकत्व जागे होणे होय. मयुरीने जे मातृत्वाच्या काळात अनुभवले तेच पुस्तकाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. मयुरी हिने उत्तम पालकत्व साकारले आहे. या पुस्तकात मुलांचा, आई बाबांचा संवाद रेखाटण्यात आला आहे.



**डॉ.मयुरी धायगुडे लिखित सार्थ पालकत्व या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते झाले प्रकाशन**

तर डॉ.शैलजा बरुरे म्हणाल्या की, डॉ.मयुरी धायगुडे यांनी हे पुस्तक प्रकाशित करुन एक वेगळा पायंडा पाडला आहे. मातृत्वाच्या काळामध्ये अनेक तरुणी या घाबरलेल्या आणि दडपणाखाली असतात त्या घाबरलेल्या तरुणींना बाहेर काढण्याचे काम हे पुस्तक करणार आहे. हे पुस्तक सिमित राहू नये त्याची कक्षा रुंदावली पाहिजे आवतीभोवतीच्या होणार्या सार्वजनिक कार्यक्रमाच्या निमित्ताने पालकांना भेट म्हणून हे पुस्तक द्यावे. जगाकडे आईच्या दृष्टीने पाहिले पाहिजे किंवा लहान मुलांसारखे पाहिले पाहिजे परंतु आपण मुलांना जखडून टाकत आहोत त्याचे जे वय खेळण्या,बागडण्याचे व मस्तीचे आहे. त्या वयात त्याच्यावर आपण आपले म्हणणे लादत असतो. खर्या अर्थाने आपण त्याचे माणूसपण हिरावून घेत असतो. डॉ.मयुरी धायगुडे यांनी हे पुस्तक भावनिक जाणवीतून लिहिले आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार अमर हबीब म्हणाले की, हे पुस्तक सध्याच्या काळातील तरुणाईला भानावर आणणारे पुस्तक आहे. या मातीतून हे पुस्तक उगवले ही अभिमानस्पद बाब आहे. आजच्या काळात हे पुस्तक आले आणि ही समाजाची गरज होती. लेकरांना सांभाळणं व संगोपन करणं हे दोन्ही वेगळं आहे. पुर्वीच्या काळी संस्कार वगैरे असे काही नव्हते. सर्व काही इतरांकडे बघून सजग व्हायचे आणि केंव्हा मोठे झाले हे कळत नव्हतं समाजाचा सुद्धा तेवढा अधिकार मुलांवर होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक या पुस्तकाच्या लेखिका डॉ.मयुरी धायगुडे यांनी केले यावेळी त्यांनी यामागची भूमिका स्पष्ट केली. डॉ. मयुरी धायगुडे म्हणाल्या की, आपण पारंपारिक पालकत्वाच्या जाळ्यात अडकलो आहोत. या जाळ्यातून बाहेर येणे महत्वाचे आहे. पालकत्व हे जोखमीचे काम आहे. पालकाचा वटवृक्ष उभा करण्याचा आपला संकल्प असून तो आता कुठे यशाच्या दिशेने सुरु झाला आहे. पालक हे स्वतःचे विचार मुलांवर लादतात त्यामुळे भ्रमनिराशा पाहायला मिळते. मुलांना बहरु देणे महत्वाचे आहे. आपण स्वतःमधील बदल स्वीकारतो पण मुलांमधील बदल स्वीकारत नाही ही शोकांतीका आहे. पालक हा मुलांना साथ देणारा व त्यांच्या आवडीनिवडीला प्राधान्यक्रम देणारा असावा लागतो. अनेकवेळा आपण कार्यशाळा आयोजित केल्या या कार्यशाळेसाठी असंख्य पालक उपस्थित राहिले त्यांना या पालकत्वाची माहिती व ज्ञान मिळाले परंतु जे कार्यशाळेला उपस्थित राहू शकत नाहीत अशांसाठी हे पुस्तक प्रकाशित करण्याचा संकल्प केला आणि अनेकांच्या सहकार्यांने हे पुस्तक परिपूर्ण झाले आहे. येणार्या काळात अनेक विषय मांडण्याचा प्रयत्न असणार आहे. या पुस्तकासाठी अनेकांनी मेहनत व परिश्रम घेतले आहेत आणि ज्यांच्यामुळे या पुस्तकाची प्रेरणा मिळाली ते माझे पती श्रीनिवास धायगुडे यांचे आपण ऋणी असल्याचे मयुरी धायगुडे यांनी सांगितले. प्रारंभी समुपदेशन केंद्राची विध्यार्थिनी कु. वैष्णवी आरसुळे हिने भावना व्यक्त करीत कृतज्ञता व्यक्त केली.मान्यवरांचे स्वागत भारतराव धायगुडे, डॉ.मयुरी धायगुडे, श्रीनिवास धायगुडे, सौ.दैवशाला धायगुडे यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार सागर कुलकर्णी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ.मयुरी धायगुडे यांचे परभणी येथील शाळेतील शिक्षक आवर्जुन उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी अंबाजोगाई शहरातील अनेक पालक, पत्रकार, मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वडवणीत 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथ वाचनास उदंड प्रतिसाद

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहर आणि तालुक्यातील सर्व गावांमध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास गावोगावी उदंड प्रतिसाद मिळत आहे. अशी माहिती भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष प्रा. प्रकाश खळगे सर यांनी दिली.

तालुक्यातील सर्व गावांमध्ये संपूर्ण देशामध्ये भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने वर्षावासाचे कार्यक्रम सुरू आहेत. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये तथागत भगवान गौतम बुद्धाने एकाच ठिकाणी बसून बौद्ध धर्माचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी भिक्खूंना मार्गदर्शन केले. हे भिखु तथागतांचे प्रवचन तीन महिन्याच्या काळामध्ये काळजीपूर्वक ऐकत होते. आपल्या हृदयामध्ये आणि बुद्धीमध्ये त्याची साठवणूक करीत होते. हे भिखू तीन महिन्याच्या नंतर चारही दिशेला तथागतांच्या आदेशाप्रमाणे धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी गावोगावी फिरत होते. त्यामुळे बौद्ध तत्त्वज्ञानाला आणि बौद्ध धम्माला प्रचंड प्रमाणामध्ये गती प्राप्त झाली होती. संपूर्ण भारत बौद्धमय तथागताने केलेला होता. सर्व जनता आनंदामध्ये आणि समाधानाने जीवन जगत होती. अशा या बौद्ध धम्माच तत्त्वज्ञान महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आत्मसात केले ..आणि १४ ऑक्टोबर १९५६ साली भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. बौद्ध धम्माची दीक्षा घेताना बाबासाहेब आंबेडकरांची व्यापक अशा पद्धतीची संकल्पना होती. परंतु दीक्षा घेतल्यानंतर अवघ्या काही महिन्यांमध्येच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले. आणि बौद्ध धम्म प्रचार आणि प्रसाराला फार मोठी खीळ बसली. परंतु त्यांचे सुपुत्र भैयासाहेब आंबेडकर यांनी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे महान कार्य हाती घेतलं. चैत्यभूमीची निर्मिती केली. बौद्धाचार्यांची निर्मिती केली आणि संपूर्ण भारतभर बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार फार मोठ्या प्रमाणात करायला सुरुवात केली. कालांतराने सूर्यपुत्र भैयासाहेब आंबेडकर यांचे निर्वाण झालं. पुन्हा एकदा धम्माची गती कमी होते की काय असे वाटू लागले. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुनबाई ममता सागर महाउपासिका मीराताई आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची प्रचार व प्रसार करण्याची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून संपूर्ण भारतभर बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करायला सुरुवात केले. अडीच हजार वर्षांपूर्वी जसे पावसाळ्यामध्ये तथागत भगवान गौतम बुद्ध एकाच ठिकाणी बसून, भिकू संघाला मार्गदर्शन करायचे, मार्गदर्शित झालेला भिकू संघ हा दाही दिशेला बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करायचा. त्याचीच पुनरावृत्ती भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून आणि मीराताई आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष भीमराव यशवंत आंबेडकर यांच्या मार्गदर्शनानुसार संपूर्ण भारत देशामध्ये आषाढी पौर्णिमा ते अश्विनी पौर्णिमा या तीन महिन्याच्या कालखंडामध्ये संपूर्ण भारत देशामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर लिखित, बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचन सुरू आहे. प्रत्येक गावात, खेड्यापाड्यात, गल्लोगल्लीत, तालुक्यात, जिल्ह्यात, राष्ट्रात, फार मोठ्या प्रमाणामध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ, वाचायला सुरुवात झालेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून भीम नगर तालुका वडवणी जिल्हा बीड या ठिकाणी बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ सतत वाचून असंख्य लोकांना बुद्ध तत्त्वज्ञानाकडे वळवण्याचं काम भीम नगर मधील भारतीय बौद्ध महा सभेच्या कार्यकर्त्या त्या उत्साहाने करीत आहेत. भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी संपूर्ण तालुक्यामध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचण्यासाठी तालुक्यातील अनेक गावांना भेटी देऊन प्रत्येक गावागावांमध्ये ग्रंथ वाचण्यासाठी लोकांना प्रभावित केले आहे.

पान ६ वरून...

### गणेश व्याख्यानमालेचे

होणाऱ्या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन समन्वयक प्रा.डॉ.गणेश पिंगळे,प्राचार्य रमण देशपांडे,प्रा.डॉ.शैलजा बरुरे ,संयोजक मुख्याध्यापक के.बी.नांदगावकर, संस्था संचालक तसेच गणेशोत्सव समितीच्या सदस्यांनी आदींनी केले आहे.

### भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या

पाहणी करून नवीन उच्च क्षमतेच्या बहुपीक मळणी यंत्राचे उद्घाटन केले. गावचे सरपंच सचिन रुद्राक्ष यांच्यासह महिला व पुरुष शेतकऱ्यांची बैठक संपन्न झाली. महिलांच्या मिलेट प्रक्रिया उत्पादने, शेवगा पावडर उत्पादन युनिट ला भेट दिली. कृषि विज्ञान केंद्र प्रक्षेत्रावर बिजोत्पादन, रोपवाटिका, यंत्र अवजार केंद्र, चारा प्रक्षेत्र, फळबाग, पशुपालन, सेंद्रिय निविष्ठा उत्पादन पकल्प, शेळीपालन, अन्न प्रक्रिया प्रकल्प, माती परीक्षण प्रयोगशाळा, जीवाणू उत्पादन प्रयोगशाळेला भेट दिली. केंद्राच्या माध्यमातून कार्यक्षेत्रात केल्या जाणाऱ्या कृषी व संलग्न विषयातील उल्लेखनीय कामाची प्रशांश केली. केंद्राद्वारे निर्मित 'कृषी ड्रोन' विषयाच्या विस्तार घडीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. कृषी विज्ञान केंद्राचे कार्य अत्यंत प्रभावी असून समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्याची आपली जबाबदारी आपण पार पाडत असल्याचे भावना शास्त्रज्ञांनी व्यक्त केली. यावेळी केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. वसंत देशमुख व विषय विशेषज्ञ यांची उपस्थिती होती.

### सलमान शेख यांची एसआरपीएफ

लावला पाहिजे अन्? तो ही आईसोबत दुसऱ्याकडे मोलमजुरी करत कामातुन मिळालेल्या वेळेत तो भरती साठी प्रयत्न ही करत होता देहवेडा होऊन त्यांने खाकीचा ध्यास घेतला अन्? त्याच्या या प्रयत्नाला शेवटी यश प्राप्त झाले अन्? वयाच्या अवघ्या चौवीसाव्या वर्षी त्याची एस आर पी एफ फॉर्स मध्ये पोलीस म्हणून निवड झाली या त्याच्या जिद्दी स्वभावामुळे मोलमजुरी करणाऱ्या आई वडीलांचे जीच झाले असे म्हणले जातं आहे या सलमानच्या निवडीबद्दल कुटुंबासह पंचक्रोशीतुन त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव देखील होतं आहे, प्रयत्न केल्याने नक्कीच यश मिळतं अन्? कोणत्याही भरतीचा सराव करताना डोळ्यासमोर आपले देह असावे व देहवेडा होऊन प्रयत्न करावेत नोकरी तुमची असे सलमान शेख ने आमचे प्रतिनिधी प्रेम पवळ यांच्याशी बोलताना सांगितले.

### सुरूडी आश्रम शाळेचे सुधाकर

शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर जि. अहमदनगर आणि बजरंग बोडके, अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, हिंगोली यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

### रयतच्या श्री गणेश विद्या मंदिर

राबवत असलेल्या विविध विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांमुळे व शाळेतील उच्चशिक्षित व अनुभवी शिक्षकवृंदामुळे हे यश मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बाडी सदस्य तथा स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन ए.टी.पोकळे,स्थानिक स्कूल कमिटी सदस्य भास्कर पोकळे,मुरलीधर पवार,शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक प्राचार्य आर एम हाके ,प्रभारी पर्यवेक्षक एफ एस जाधवर ,सर्व स्कूल कमिटी सदस्य ,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य ,शाळा व्यवस्थापन व विकास समिती सदस्य तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन केले.

### नितेश राणेची आमदारकी रद्द करा

यांच्या अश्या वक्तव्याने महाराष्ट्रात दोन जाती धर्मात तेढ निर्माण होत असल्याने याला वेळीच आवर घालने गरजेचे आहे, याची उंची किती आणि बोलतो किती याच भान या निलेश राणे ने करायला पाहिजे निलेश रानेत हिम्मत असेल तर महाराष्टातील एखाद्या मशिदे मध्ये घुसून दाखवावे , लव्ह जिहाद च्या नावाखाली मोर्चे काढून मुस्लिम समाजावर बेताल वक्तव्य करत आहे त्याला कोणता कायद्याची भीती ना,पोलिसा प्रशासनाच्या समोर तो गरड ओकतो आणि पोलीस फक्त बघ्याची भूमिका घेतात याच्याच जागेवर जर मुस्लिम च एखादा पुढारी कीवा कार्यकर्ता असला असता तर त्याच्या विरोधात कार्यवाही होऊन जेल मध्ये टाकले असते , कायद्याची भीती राहिली नाही का असल्या वाचाळ विरा विरोधात कार्यवाही झालीच पाहिजे जेणे करून महाराष्ट्राचा सलोखा अबाधित राहण्यास मदत होईल . सर्वोच्च सभागृह मध्ये आमदारकीची शपथ घेता ना सर्व धर्माचा आदर करील शपथ घेतली असताना एका विशिष्ट जातीवर बोलून घेतलेल्या शपथे च भंग केला असल्याने निलेश राणे ची आमदारकी रद्द करावी अशी मागणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांना निवेदना द्वारे अड. जब्बार पठान यांनी कळवले आहे .

### शासनाच्या आदेशाला

सकाळी ७ नंतर असल्याचे दिसून येते.आधुनिक युगातील बदलेली जीवनशैली, मनोरंजनाची विविध साधने, शहरातील उशिरापर्यंत सुरु असलेल्या ध्वनिप्रदूषण उदा. वाहनांचा आवाज, विविध कार्यक्रमांच्या अनुषंगाने वाजविले जाणारे कर्कश संगीत इ. अशा अनेकविध कारणांमुळे विद्यार्थी रात्री उशिराने झोपत आहेत व सकाळी लवकर शाळा असल्याने त्यांची झोप पूर्ण होत नाही. ज्याचा नकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होताना दिसत आहे.पालकांच्या मते पाल्याची झोप ही सकाळी पूर्ण न झाल्याने शाळेत जाण्यास लवकर उठण्यासाठी तयार नसतात.सकाळी लवकर शाळा असल्याने विद्यार्थ्यांची रात्रीची झोप पूर्ण होत नसल्याने ते दिवसभर आळसलेले दिसून येतात. त्यामुळे बऱ्याचदा अध्ययनासाठी आवश्यक असणारा उत्साह कमी असलेला दिसून येतो. ज्याचा नकारात्मक परिणाम त्यांच्या अध्ययनावर होतो.मोसमी हवामान, विशेषता हिवाळा व पावसाळा या ऋतू मध्ये सकाळी लवकर उठून शाळेत जाणे, पावसामुळे व थंडी मुळे अनेक विद्यार्थ्यांना त्रास होतो. ते बहुदा आजारी पडतात.सकाळी पाल्याला लवकर तयार करणे, जेवणाचा डबा तयार करणे आणि पाल्याला वेळेत शाळेत सोडणे यामुळे देखील अनेक पालकांची ओढाताण होते, सकाळी लवकर भरणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांना बस व व्हॅन द्वारे नेताना रस्त्यावरील धुके, पाऊस यामुळेही अडचणीनिर्माणहोतात.यानुसार शाळेच्या वेळेत बदल करताना शहरातील शासकीय व निमशासकीय कार्यालयाच्या वेळा व शाळांच्या वेळा समांतर येणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे, अन्यथा शहरी भागात वाहतुकीच्या मोठ्या समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. यानुसार शाळांच्या वेळेत बदल करताना दोन सत्रामध्ये भरणाऱ्या शाळांनी नियोजन करताना किमान प्राथमिक स्तरावरील विद्याथ्यर्थ्यांसाठी दुस-या सत्राचाविचारकरावा.

### बदल न करणाऱ्या शाळेवर

राज्यपाल यांनी सांगून आणि शासनाने आदेशीत करून देखील वेळेत न बदल करणाऱ्या शाळेवर कारवाई होणार का ? असा सवाल उपस्थित होत आहे.

### श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात

आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप शाळेचे उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे सर यांनी केले, प्रास्ताविक, आभार व सुत्रसंचलन श्रीमती सुरेखा गवळी मॅडम यांनी केले. यानंतर प्रशिक्षकांनी शाडुच्या मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याचे प्रात्यक्षिके सादर केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी कलाध्यापक नवनाथ सांगुळे, माधव जोशी, सर्व शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले.

cmyk

# पावसाचा धुमाकूळ; पिके हातची जाण्याची भीती

जळगाव : खानदेशात मागील तीन-चार दिवसांत अनेक भागांत जोरदार ते मध्यम पाऊस झाला आहे. काही भागांत जोरदार पावसाने दाणादाण उडाली. उडीद, मूग पिके हातची जातील, अशी भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. जळगाव जिल्ह्यात एकूण सरासरीच्या १०० टक्के पाऊस झाला आहे. जून ते ऑगस्ट या तीनच महिन्यांत जळगावात पावसाने सरासरी ओलांडली आहे. ६३२ मिलिमीटर पाऊस जिल्ह्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत पडतो.

धुळे व नंदुरबारमध्येही पावसाने धुमाकूळ घातला आहे. तेथेही तीनच महिन्यांत ९५ टक्क्यांवर पाऊस झाला. नंदुरबारमध्ये नवापूर, अक्कलकुवा भागात अतिपावसाने अनेक नदी-नाल्यांना पूर आला आहे. यामुळे सुरत-धुळे महामार्गावरील वाहतूक काही तास बंद करावी लागली होती. रंगावली नदीस मोठा पूर आल्याने नंदुरबारातील नवापूर भागात वाहतुकीवर परिणाम झाला. धुळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत ५६५ मिलिमीटर पाऊस पडतो. नंदुरबारात ८५२ मिलिमीटर पाऊस या कालावधीत पडतो. परंतु या दोन्ही जिल्ह्यांतही तीनच महिन्यांत ९५



टक्क्यांवर पाऊस झाला. जळगाव जिल्ह्यातील जामनेर, बोदवड मुक्ताईनगर व भुसावळ भागात अतिपाऊसही मागील तीन दिवसांत झाला. जामनेरातील तोंडापूर व मालदाभाडी येथे अतिवृष्टी झाली. मुक्ताईनगरातही अतिवृष्टी झाली.

अतिपावसाने कापूस, उडीद, मूग ही पिके हातची जातील, अशी स्थिती आहे. कारण सतत पाऊस सुरूच आहे. पावसाची फारशी उघडीप नाही. ऊन, निरभ्र वातावरण नसते. यामुळे पिकहानी वाढत आहे. खानदेशात प्रमुख पीक कापूस आहे. आठ लाख हेक्टरवर कापूस पीक आहे. कापूस पिकास अतिपाऊस नको असतो. परंतु यंदा चार महिन्यांमध्ये अपेक्षित असलेला पाऊस तीनच महिन्यांत झाल्याने कापूस पिकाची हानी सुरू झाली आहे. काळ्या कसदार जमिनीत कापूस पिकाची स्थिती बिकट आहे. परंतु हलक्या, मध्यम जमिनीत कापूस पीकस्थिती बरी आहे. उडीद, मूग पिकाच्या शेंगा काढणीवर किंवा मळणीवर आल्या होत्या. अशात पावसाने शेंगांना कोंब फुटू लागले आहेत.

वाघूर नदीचा रुद्रावतार

छत्रपती संभाजीनगरातील अजिंठा घाट व माथ्याकडे उगम असलेल्या वाघूर नदीला महापूर आला आहे. घाट-माथ्यासह जामनेरात अतिपाऊस झाल्याने नदीने रुद्रावतार धारण केला. नदीचे पाणी वाकोद व लगतच्या शिवारात शिरले आहे. वाकोद व परिसरातील केळीच्या शेतीला मोठा फटका बसला आहे. तसेच जामनेरीील हिवरी दिगर व पिंपळगाव येथेही केळीच्या शेतांत पाणी शिरल्याने पाच शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. हिवरी दिगर गावातील पाच घरेही नदीच्या पुरात वाहून गेली आहेत.

## फ्लॉवर, टोमॅटो, ऊस कुजण्याच्या स्थितीत, बदलत्या हवामानाचा परिणाम

पुणे : सतत होत असलेल्या पाऊस त्यानंतर अचानक ऊन पुन्हा पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे शेती पिकाच्या मोठ्या नुकसानीला सामोरे जाण्याची वेळ येत आहे. विचित्र वातावरणामुळे ऊस, भाजीपाला, हळद, केळी, फुलशेती, पालेभाज्या या पिकांना पावसाचा फटका बसत आहे. सतत पाऊस आणि उन्हामुळे हुमणी, गोगलगाय, पाने खाणाऱ्या अळ्याची वाढ झाल्याने शेतीचे मोठे नुकसान होत आहे.

वाढलेल्या उसात हुमणीचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे ऊस वाळत आहे, वाढ खुंटली आहे. हवामानामुळे तांबेरा वाढला आहे. काही दिवस सणांची पर्वणी असल्यामुळे फुल शेतीची लागण झाली आहे. मात्र संततधार पावसामुळे फुलात पाणी साचून फुले कुजत आहेत. भिजलेली फुले बाजारपेठेत खरेदी केली जात नाहीत. नवीन लागण केलेल्या झाडे अतिपाण्यामुळे खराब होत आहेत. केळीच्या झाडांची पाने फाटली आहेत. कोंदट वातावरणामुळे ऊसावर तांबेरा व लागणीवर हुमणी अळीचा प्रादुर्भाव आहे. सोयाबीनवर किडीचा पाने खाणारी अळी व शेंगा पोखरणाऱ्या अळीचा परिणाम होत आहे. घात नसल्याने फवारणी घेण्यावर बंधन येत आहे. जिथे ओढ्याकाठी तण आहे तिथे पाणी साठल्याने भाजीपाला पिकात गोगलगायचा प्रादुर्भाव झाला आहे. संततधार पाऊस व ऊन पावसाच्या लपंडावामुळे लागण केलेल्या फ्लॉवरवर करप्या आला आहे. त्यामुळे पाने खराब होत आहेत. तसेच टोमॅटोचा फड जुना आहे, तर दुसरा आता सुरू झालेला आहे. प्रतिकूल हवामानानुळे जुना फड वाळतच आहे. नवीन फडातील झाडांवर करप्या आला आहे. त्यामुळे झाडे खराब होत असल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली.



## योग्य पद्धतीने शेळीपालन केल्यास होतो मोठा फायदा

भारताच्या एकूण पशुधन लोकसंख्येपैकी सुमारे २८ टक्के शेळ्या आहेत आणि देशाच्या एकूण मांस उत्पादनात १४% योगदान शेळीपालनाचे आहेत. याव्यतिरिक्त, शेळ्या ५.८५ दशलक्ष टन दूध उत्पादन करतात जे राष्ट्रीय दूध उत्पादनाच्या ३% आहे. यशस्वी व्यावसायिक शेळीपालन वैज्ञानिकदृष्ट्या योग्य संगोपन पद्धतीवर अवलंबून आहे. या पद्धतींमध्ये शेळ्यांची हालचाल व्यवस्थापित होण्यासाठी त्यांना योग्यप्रकारे दोरीने बांधणे, चांगल्या आरोग्यासाठी शेळ्यांच्या गोठा स्वच्छ आणि हवेशीर ठेवणे, मुक्तगोठा पद्धतीद्वारे पाहिजे तेव्हा शेळ्यांना धान्य, पाणी आणि चारा उपलब्ध करून देणे या गोष्टींचा समावेश आहे.



शेळीपालनाची जागा : शेळीपालन व्यवसायाच्या यशासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे योग्य जागेची निवड. शेळ्या आणि शेतमालाच्या वाहतुकीसाठी सुलभ रस्ता असणे गरजेचे आहे. पावसाळ्यात किंवा ओलसर परिस्थितीत आरोग्य समस्या टाळण्यासाठी प्रभावी ड्रेनेज आवश्यक आहे. शेळ्यांना पुरेशी जागा असणे देखील महत्त्वाची आहे, प्रत्येक ५० शेळ्यांमागे अंदाजे एक एकर जमिनीची शिफारस करण्यात आली आहे जेणेकरून चरण्यासाठी आणि राहण्यासाठी जागा सुनिश्चित होईल व कळपाचे एकूण आरोग्य आणि उत्पादकता वाढेल.

शेळीच्या योग्य जातींची निवड व प्रजनन : शेळीपालनामध्ये प्रभावी प्रजनन व्यवस्थापनाची सुरुवात उच्च दर्जाचे दूध उत्पादन करण्यास सक्षम असलेल्या निरोगी, शेळीच्या जाती निवडीपासून होते. मुख्य वैशिष्ट्यांमध्ये प्रजनन क्षमता, नियमित प्रजनन चक्र आणि मजबूत पाय, रुंद पाठ आणि सुस्थित कासे यासारखी शारीरिक वैशिष्ट्ये असणाऱ्या जातींचा समावेश होतो. प्रजनन सामान्यत: जेव्हा मादी ६-१० महिन्यांच्या दरम्यान परिपक्वतेपर्यंत पोहोचते तेव्हा सुरू होते आणि पुरुष १२ महिन्यांनी परिपक्व होतात. दर १७-२१ दिवसांनी शेळीच्या माज येण्याचा कालावधी ओळखून मार्च ते मे आणि सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत प्रजनन हंगामाचा लाभ घ्यावा. दरवर्षी दोन पिल्ल्यांचे लक्ष्य ठेवावे. शेळ्यांची गर्भधारणा अंदाजे १५५ दिवस टिकते आणि मादी ५-७ वर्षे प्रजनन करू शकतात, तर नर ८-१० वर्षे प्रजननासाठी सक्षम असतात .

शेळ्यांचे खाद्य : शेळीपालनात खाद्य व्यवस्थापन हे शेळ्यांच्या निवडक खाण्याच्या सवयीवर अवलंबून असते. कृषी उप-उत्पादने, शेंगायुक्त चारा आणि कडधान्ये, गहू आणि मका यासारख्या धान्यांवर शेळ्यांची भरभराट होते. त्यांच्या आहारात किमान १४-१५% प्रथिने आणि आवश्यक खनिजे असावीत. दैनंदिन आहारामध्ये वाढत्या शेळ्यांसाठी १०० ग्रॅम आणि प्रौढांसाठी २००-२५० ग्रॅम कॉन्सन्ट्रेट चारा , ५-७ किलो हिरवा चारा आणि पाणी पुरवले जाते.

शेळ्यांचे आरोग्य व्यवस्थापन : शेळ्यांच्या आरोग्य व्यवस्थापनामध्ये शेडची नियमित साफसफाई, दर सहा महिन्यांनी जंतनाशक औषध देणे, आणि शेळी पॉक्स आणि एफएमडी यांसारख्या रोगांवरील लसीकरण यांचा समावेश होतो. अशा पद्धतीने शेळ्यांचे योग्य व्यवस्थापन केल्यास शेळीपालन व्यवसाय नक्कीच फायदेशीर आणि शाश्वत ठरेल.

## खरीप पिकांचे आपत्कालीन व्यवस्थापन

सप्टेंबर महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे. लवकर आणि वेळेवर पेरणी केलेल्या कापणीच्या अवस्थेत असलेल्या पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. राज्यातील वेगवगळ्या भागात विविध पिकांची कशी काळजी घ्यावी याविषयी तज्ज्ञांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. यासाठी शेतकऱ्यांनी पिकांचे नुकसान टाळण्यासाठी या सल्ल्याचा अवलंब करावा. खरीप पिके, भाजीपाला आणि फळबागातील अतिरिक्त पाणी काढून टाकण्याची व्यवस्था करावी. काढणीस आलेल्या मूग आणि उडीद पिकाची लवकरात लवकर काढणी करावी व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. भुईमुग पिकात रस शोषक किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास फ्लूबेनडयामाइड ३.५% + हेक्साकोनाझोल ५% डब्ल्यूजी २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.



कापूस : पावसाची उघडीप बघून कापूस पिकात आंतरमशागतीची कामे करावीत. कापसाचे पीक ८० दिवसाचे झाल्यानंतर मुख्य फांदीचा शेंडा खुडावा यामुळे पिकात कायिक वाढ मर्यादित होते.

हळद पीक : पिकामध्ये गरजेनुसार बेणणी करून करून नत्र खताची दुसरी मात्रा ८५० ग्रॅम युरिया प्रति गुंठा लागवडीनंतर तीन महिन्यांनी पावसाची तीव्रता कमी असताना द्यावी. कंदमाशीचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास व्यवस्थापनासाठी १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% २० मिली किंवा डायमिथोएट ३० % १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून-पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. जमिनीत वापसा असताना पिकात आंतरमशागतीची कामे करून पिक तण विरहीत ठेवावे.

तूर : हे पीक ४५ दिवसाचे झाल्यानंतर शेंडे ५ सेंमी वरून खुडावेत. खोडमाशीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ५% निंबोळी अर्क किंवा डायमेथोएट ३०% प्रवाही १५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

सोयाबीन पीक : सोयाबीन पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. पांढऱ्या माशीचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी एकरी १० ते १५ पिवळे चिकट सापळे लावावेत. पिवळा मोझॅक रोगाचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास प्रादूर्भाव ग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. रोगाच्या व्यवस्थापनासाठी ॲसिटामिप्रिड २५% + बाइफेन्थ्रीन २५% डब्ल्यू जी १०० ग्रॅम किंवा बीटा साइफ्लुथ्रीन ८.४९% + इमिडाक्लोप्रीड १९.८१% ओडी १४० मिली किंवा थायमिथोक्झाम १२.६% + लॅम्बडा सिहॅलोथ्रीन ९.६% झेड सी ५० मिली प्रति एकर यापैकी एका किटकनाशकाची कोणत्याही प्रकारचे तणनाशक न मिसळता पावसाची उघड बघून फवारणी करावी. करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेब्युकोनॅझोल १०% + सल्फर ६५% १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. किडींच्या व्यवस्थापनासाठी क्लोरँट्रानिलीप्रोल १८.५% ६० मिली प्रति एकर किंवा थायामिथोक्झाम १२.६% + लँबडा सायहॅलोथ्रिन ९.५% (पूर्वमिश्रित किटकनाशक) ५० मिली प्रति एकर किंवा क्लोरँट्रानिलीप्रोल ९.३% + लँबडा सायहॅलोथ्रिन ४.६% ८० मिली प्रति एकर (पूर्वमिश्रित किटकनाशक) किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८% १०० ते १२० मिली प्रति एकर किंवा बिटा सायफ्ल्युथ्रीन ८.४९% + इमिडाक्लोप्रीड १९.८१% (पूर्वमिश्रित किटकनाशक) १४० मिली प्रति एकर यापैकी कुठलेही एक किटकनाशक फवारावे.

खरीप ज्वारी : पिकात लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील किटकनाशकांची आलटून पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. फवारणी करत असतांना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी.

ऊस पीक : अतिरिक्त पाणी साचणे, कमी तापमान व वाढलेल्या आर्द्रतेमूळे पिकात पोक्का बोइंग रोगाचा प्रादूर्भाव दिसून येत आहे, व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डब्ल्यूपी ५० ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डब्ल्यू पी २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून स्टीकरसह पावसाची उघड बघून १० ते १२ दिवसाच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात. पिकात हूमणीच्या अळ्या दिसून येत असल्यास मेटाराईझीयम ॲनोसोप्ली या जैविक बूरशीचा ४ किलो (जास्त प्रादुर्भाव असल्यास १० किलो) प्रति एकर जमिनीतून वापर करावा. खोड किडीच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २०% २५ मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल १८.५% ४ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. लिंबूवर्गीय पिके : मृग बहार संत्रा/मोसंबी बागेत किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी डायकोफॉल २५-३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. बागेत फळगळ दिसून येत असल्यास एनएए १५ पीपीएम ची फवारणी करावी.

डाळिंब : बागेतील अतिरिक्त फुटवे काढून टाकावेत. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी डायकोफॉल २५-३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### भारतीय संस्कृत दिन
### शिक्षक दिन भारत

### महत्वाच्या घटना

१९३२ : फ्रेन्च अपर व्होल्टा या प्रांताचे विभाजन करुन आयव्हरी कोस्ट, फ्रेन्च सुदान आणि नायगर असे देश निर्माण करण्यात आले.
१९४१ : इस्टोनिया हा प्रांत नाझी जर्मनीने ताब्यात घेतला.
१९६७ : ह. वि. पाटसकर पुणे विद्यापीठाचे सातवे कुलगुरू झाले.
१९७७ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने बाह्य सौरमालेचा अभ्यास करण्यासाठी व्हॉएजर १ या उपग्रहाचे पृथ्वीवरून उड्डाण केले
१९८४ : एसटीएस -४१-डी ही नासाच्या स्पेस शटल प्रोग्रामची १२ वी फ्लाइट आणि स्पेस शटल डिस्कवरीचे पहिले मिशन होते. हे डिस्कव्हरी यान आपली पहिली अंतराळ यात्रा पूर्ण करून कॅलिफोर्नियामधील एडवड्र्स एअर फोर्स बेस येथे दाखल झाले.
२००० : ज्येष्ठ दिग्दर्शक हृषीकेश मुकर्जी यांना 'दादासाहेब फाळके' पुरस्कार जाहीर
२००५ : इंडोनेशियातील सुमात्रा येथे मंडाला एअरलाइन्सचे 'फ्लाईट ०९१' हे उड्डाण दाट लोकवस्तीच्या भागात कोसळुन विमानातील १०४ आणि जमिनीवरील ३९ लोक ठार झाले.
२०१२ : स्पेनमध्ये टेलिव्हिजनवर बंदी घालण्यात आलेल्या थेट बुलफाईटिंगच्या प्रसारणावर सहा वर्षाची बंदी उठवण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

११८७ : लुई (आठवा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ८ नोव्हेंबर १२२६)
१६३८ : लुई (चौदावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: १ सप्टेंबर १७१५)
१८७२ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी आणि तामिळनाडू राज्यातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेता व लोकमान्य टिळक यांचे शिष्य वी. ओ. चिदंबरम पिल्लै यांचा जन्मदिन.
१८८८ : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती, पहिले उपराष्ट्रपती आणि तत्त्वज्ञ, त्यांच्या गौरवार्थ त्यांचा जन्मदिन हा भारतात 'शिक्षक दिन' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: १७ एप्रिल १९७५)
१८९५ : अनंत काकबा प्रियोळकर भाषा व इतिहास संशोधक, लेखक, संपादक व समीक्षक. त्यांनी संपादित केलेल्या विविध ग्रंथात रघुनाथपंडित कृत 'दमयंती स्वयंवर' व मुक्तेश्वरकृत 'महाभारताचे आदिपर्व' हे उल्लेखनीय आहेत. (मृत्यू: १३ एप्रिल १९७३)
१९०५ : प्रसिद्ध भारतीय उपन्यासकार, कथाकार व संपादक वाचस्पती पाठक यांचा जन्मदिन.
१९०७ : जयंत पांडुरंग तथा 'जे. पी.' नाईक शिक्षणतज्ञ, 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन'चे संस्थापक, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग'चे संस्थापक, भारतामध्ये प्रथमच स्थापन केल्या गेलेल्या शैक्षणिक आयोगाचे सभासद सचिव (मृत्यू: ३० ऑगस्ट १९८१)
१९२० : लीला पोतदार तथा लीलावती भागवत बालसाहित्यिका. ओघवती भाषा, चित्रमय वर्णन व बोलकी संवादशैली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या 'स्वर्गाची सहल आणि इतर कहाण्या' या पुस्तकाचा 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने ११ भाषांत अनुवाद प्रसिद्ध केला. (मृत्यू: २५ नोव्हेंबर २०१३)
१९२८ : दमयंती जोशी सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना (मृत्यू: १९ सप्टेंबर २००४)
१९३३ : आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' ने सन्मानित करण्यात आलेले भारतीय नौदलाचे माजी सेवानिवृत्त प्रमुख अधिकारी व लोकपाल लक्ष्मीनारायण रामदास यांचा जन्मदिन.
१९४० : रॅक्वेल वेल्श अमेरिकन अभिनेत्री
१९५४ : वेस्ट इंडिजचा क्रिकेट खेळाडू रिचर्ड ऑस्टिन यांचा जन्म.
१९४६ : मूळ भारतीय वंशाचा ब्रिटीश गायक व संगीतकार फ्रेडी मर्क्युरी यांचा जन्म.
१९८६ : भारतीय क्रिकेटपटू प्रज्ञान ओझा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०६ : लुडविग बोल्टझमन ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २० फेब्रुवारी १८४४)
१९१८ : सर रतनजी जमसेटजी टाटा टाटा घराण्यातील उद्योगपती व दानशूर व्यक्ति (जन्म: २० जानेवारी १८७१)
१९७८ : रघुनाथ रामचंद्र तथा रॉय किणीकर कवी, संवादलेखक, नाटककार व पत्रकार. 'रात्र' आणि 'उत्तररात्र' हे त्यांचे कवितासंग्रह विशेष गाजले. मुंबई आकाशवाणीवरील 'वार्यावरची वरात' व 'मेघदूत' या श्राव्य नियतकालिकांचे ते निर्माते व लेखक होते. (जन्म: ? ? १९०८)
१९८६ : अशोक चक्र पुरस्कार सन्मानित भारतीय महान वैमानिक नीरजा भनोट यांचे निधन.
१९८६ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शिक्षणतज्ञ व हिंदी साहित्यिक अंबिका प्रसाद दिव्य यांचे निधन.
१९९१ : शरद जोशी पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी कवी, लेखक, व्यंगचित्रकार आणि हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन मालिका संवाद आणि पटकथा लेखक (जन्म: २१ मे १९३१)
१९९२ : अतूर संगतानी उद्योगपती व दानशूर व्यक्ति (जन्म:)
१९९५ : सलील चौधरी हिंदी व बंगाली चित्रपटसृष्टीतील संगीतकार (जन्म: १९ नोव्हेंबर १९२२ चिंगरीपोथा, २४ परगणा, पश्चिम बंगाल)
१९९६ : भारतीय बिशप बॅसिल सालदवदोर डिसोझा यांचे निधन. (जन्म: २३ मे १९२६)
१९९७ : मदर तेरेसा शांततेचा नोबल पारितोषिक आणि भारतातील सर्वोच्च नागरिक पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध समाजसेविका, व कॅथोलिक चर्चच्या धर्मगुरू (जन्म: २६ ऑगस्ट १९१०)
२००० : रॉय फ्रेड्रिक्स वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू (जन्म: ११ नोव्हेंबर १९४२)
२०१५ : भारतीय गायक-गीतकार आदेश श्रीवास्तव यांचे निधन. (जन्म: ५ सप्टेंबर २०१५)

# एसटी कामगारांचे धरणे; मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन प्रलंबित प्रश्न तात्काळ मार्गी लावू - आ. टोपे

जालना। प्रतिनिधी

एसटी कामगारांच्या प्रश्नांसंदर्भात तातडीने मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन आ. राजेश टोपे यांनी येथे दिले. एस.टी. कामगारांच्या प्रलंबित आर्थिक व महत्त्वाच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी मंगळवार (दि ३) रोजी धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी आ. राजेश टोपे यांनी महाराष्ट्र एस.टी. कामगार संयुक्त कृती समितीच्या जालन्यातील पदाधिकार्यांशी दूरभाषवरुन चर्चा करत त्यांनी कामगारांना आश्वस्त केले. यावेळी आ. टोपे यांनी पदाधिकार्यांशी चर्चा करतांना म्हटले आहे की, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याशी आपण स्वतः चर्चा करु, एसटी कामगारांचे प्रश्न गंभीर आहेत. मुख्यमंत्र्यांना याबाबत अवगत करुन बैठक घेण्यासाठी आग्रह करु आणि या बैठकीच्या माध्यमातून आपले प्रलंबित आर्थिक व महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीच्या वाढीव दराच्या थकबाकीबाबत, सातवा वेतन आयोग लागू करणे यासह सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी पुढाकार घेऊ व



प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन त्यांनी यावेळी पदाधिकार्यांना दिले. आ. राजेश टोपे यांच्या आदेशानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक शहर जिल्हाध्यक्ष राजेंद्र जाधव, जिल्हा शहराध्यक्ष नंदकिशोर जांगडे यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. व आ. राजेश टोपे यांचा आंदोलनाला पाठींबा असल्याचे महाराष्ट्र एस.टी. कामगार संयुक्त कृती समितीच्या पदाधिकार्यांना सांगत या पदाधिकार्यांशी राजेंद्र जाधव यांनी चर्चा केली. चर्चा अंती आ. राजेश टोपे यांना राजेंद्र जाधव यांनी फोनवरुन कामगारांचे प्रश्न सांगून या पदाधिकार्यांचा संवाद साधून दिला. महाराष्ट्र एस.टी. कामगार संयुक्त कृती समितीच्यावतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, रा.प. कामगारांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यांवर दि. ११/०९/२०२३ रोजी शासन पातळीवर झालेल्या बैठकीत महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीच्या वाढीव दराच्या थकबाकीबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपमुख्यमंत्री तथा मंत्री वित्त व नियोजन, उद्योग मंत्री यांच्यासह संघटनेच्या प्रतिनिधी समवेत १५ दिवसात बैठक घेऊन निर्णय घेण्याचेही मान्य केले होते. त्यास ९ महिन्यापेक्षा अधिक कालावधी उलटून गेला असतांनाही अद्याप बैठक झालेली नाही. रा.प. कामगारांना सदरची थकबाकी मिळणे अपेक्षित आहे. त्याबरोबर त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्याचा निर्णय ही प्रलंबित आहे.

एस.टी. कामगारांची निर्माण झालेली नाराजी विचारात घेऊन म.रा.मा.प. महामंडळातील महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटना (मान्यताप्राप्त संघटना), महाराष्ट्र एस.टी. कामगार सेना, महाराष्ट्र एस.टी. कर्मचारी काँग्रेस, कास्ट्राईब रा.प. कर्मचारी संघटना, महाराष्ट्र एस.टी. वर्कर्स काँग्रेस (इंटक), महाराष्ट्र मोटार कामगार फेडरेशन, महाराष्ट्र एस.टी. कामगार कॉंग्रेस, राज्य परिवहन यांत्रिक कामगार संघटना, महाराष्ट्र परिवहन मजदूर युनियन, रिपब्लिकन एस.टी. कर्मचारी संघटना, बहुजन रा.प. कर्मचारी संघटना या संघटनांची संयुक्त कृती समिती स्थापन करून सदरच्या कृती समितीच्यावतीने रा.प. कामगारांचे खालील प्रलंबित आर्थिक मागण्यांची महाराष्ट्र राज्याची विधानसभेची आचार संहिता लागू होण्यापुर्वी सोडवणूक होण्यासाठी दि. ९ व १० जुलै, २०२४ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन करण्यात आले. सदर आंदोलनानंतरही सदर प्रश्नांची सोडवणूक न झाल्यामुळे दि. ३ सप्टेंबर २०२४ या दिनांका पासून राज्यभर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. एस.टी. कामगारांचे वेतन कमी असल्यामुळे राज्य शासनाने माहे नोव्हेंबर, २०२१ पासून ज्या एस.टी. कामगारांची सेवा ०१ ते १०वर्षापर्यंत झालेली आहे त्यांच्या मुळ वेतनात रु. ५०००/-, ११ ते २० वर्षापर्यंत सेवा झालेल्या कर्मचा-यांच्या मुळ वेतनात रू. ४०००/- व २० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचा-यांच्या मुळ वेतनात रू. २५००/- अशी वाढ लागू केली. सदर वाढीमुळे सेवा जेष्ठ कर्मचा-यांच्या मूळ वेतनात मोठी तफावत निर्माण झालेली आहे. सदरची तफावत दूर करण्यासाठी सरसकट रु. ५०००/- वाढ दिल्यास सदरची तफावत दूर होणार असल्याचेही निवेदनात नमूद आहे. एसटी कर्मचार्यांचे वेतन, त्यातील तफावत, कामगारांना लागू केलेली वेतनवाढ, महागाई भत्त्याची थकबाकी, वैद्यकिय खर्च, शिस्त व अपिल कार्यपद्धतीत बदल, कर्मचारी व कुटुंबियांसाठी एसटी पास सवलत, आदी समस्या मांडण्यात आल्या. आ. राजेश टोपे यांच्यावतीने राजेंद जाधव, नंदकिशोर जांगडे यांनी निवेदन स्विकारले. यावेळी एम.एस. पवार, पी. टी. कर्वे, एस. एस. चव्हाण, पी. के. कुलकर्णी, शेख जुबेर, एम. बी. गवई, टी. ए. लकडे, जे.पी. देशमुख यांच्यासह कृती समितीचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

## थोडक्यात



### पोषण सप्ताहाचे उद्घाटन

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील गृहशास्त्र विभागात ०२ सप्टेंबर रोजी पोषण सप्ताहाचे उत्साहात उद्घाटन संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, पदव्युत्तर विभाग संचालक प्रो. गणेश पाचकोरे, क. म. उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्राचार्य प्रो. हांगे म्हणाले कि, उत्तम आरोग्यासाठी आहारात प्रथिने, कार्बोदके, जीवनसत्वे, क्षार व चरबीयुक्त पदार्थ अशा सर्वच घटकांची गरज असते. विद्यार्थिनींनी आपले आरोग्य जपण्यासाठी संतुलित आहाराला महत्व दिले पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कावेरी खुरणे यांनी केले. आभारप्रदर्शन गृहशास्त्र विभागप्रमुख प्रा. मनिषा गाढवे यांनी केले. कार्यक्रमास प्रा. विमल अलापुरे, प्रा. मनिषा पाडिया यांच्यासह विभागाच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

### आष्टीचे तहसीलदारपद महिनाभरापासून रिक्त

आष्टी। प्रतिनिधी

आष्टी येथील तहसीलदार यांची बदली झाली असून त्यांच्या जागी नियुक्ती मिळालेल्या तहसीलदार अद्याप रुजू न झाल्याने तहसीलदारांचे पद गेल्या महिनाभरापासून रिक्त आहे. यामुळे नागरिकांची कामे खोळंबली असून प्रचंड गैरसोय होत आहे. आष्टी तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र मोठे असून आष्टी, कडा, टाकळसिंग, दौलावडगाव, धामणगाव, धानोरा, पिंपळा ही सात महसुली मंडळे व १७२ गावे आहेत. त्यामुळे महसुल विभागाच्या कामकामजाची व्याप्तीही मोठी आहे. वर्षभरापूर्वी येथे नियुक्ती मिळालेले तहसीलदार प्रमोद गायकवाड यांची महिनाभरापूर्वी बदली झाल्याने त्यांच्या रिक्त जागेवर शासनातर्फे वैशाली नालगोंडा पाटील यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. मात्र, तहसीलदार अद्याप रुजू झालेल्या नाहीत. पूर्वी नियुक्त असलेले तहसीलदार प्रमोद गायकवाड हे त्यांच्या कार्यकाळात सतत सुट्या व रजेवर असल्याने वर्षभरापासून न्यायिक व अर्धन्यायिक प्रकरणे मार्गी लागलेली नसून ती धूळखात पडलेली आहेत. न्यायिक प्रकरणांच्या तारखा होत नसल्याने अनेक प्रकरणे पुढे ढकलली जात आहेत. ५५ ते ६० किलोमीटर अंतरावरून तालुक्याच्या ठिकाणी तहसील कार्यालयात येणाऱ्या पक्षकारांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

### प्रा.शशिकांत कन्हेरे यांची निवड

म्हसोबावाडी। प्रतिनिधी



संभाजी ब्रिगेडच्या बीड जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते संभाजी ब्रिगेडची मुलूख मैदानी तोफ प्रा शशिकांत कन्हेरे यांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष ॲड मनोज आखरे व महासचिव सौरभ खेडेकर यांच्या आदेशानुसार निवड करण्यात आली आहे. सामाजिक कार्यात सतत अग्रेसर राहणा-या प्रा कन्हेरे यांची थेट बीड जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याने बीड जिल्हयात आनंद व्यक्त केला जात आहे. मराठवाडासह बीड जिल्ह्यात संभाजी ब्रिगेडचा विचार सर्वदूर पोहोचविला.प्रा शशिकांत कन्हेरे यांनी सामाजिक बांधिलकी मानून केलेले कार्य तसेच ते अनेक वर्षांपासून पुरोगामी चळवळीत सक्रिय आहेत. त्यांची सामाजिक व राजकीय वाटचाल या सर्व कार्याची दखल घेऊन संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड.मनोज आखरे यांनी प्रा शशिकांत कन्हेरे यांची बीड जिल्हाध्यक्षपदी निवड करून त्यांना शुभेच्छा दिल्या.दरम्यान आपल्या निवडीविषयी आभार मानून बोलताना प्रा शशिकांत कन्हेरे यांनी सांगितले की,संभाजी ब्रिगेडचे संघटन वाढीवर भर देणार आहोत. समाजातील प्रश्न सोडविणार आहोत.तसेच सामान्य माणसांवर होणा-या अन्याय-अत्याचारा विरूद्ध लढण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून २४ तास जनसेवेसाठी उपलब्ध असेन असे नवनिर्वाचित बीड जिल्हाध्यक्ष प्रा शशिकांत कन्हेरे यांनी सांगितले.त्यांच्या या निवडीबद्दल प्रदेश संघटक डॉ सुदर्शन तारक,विभागिय अध्यक्ष ॲड राहुल वायकर,मराठा सेवा संघाचे आष्टी तालुकाध्यक्ष इंजिनिअर तान्हाजी जंजीरे याच्यासह मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेडचे पदाधिकारी, कार्यकर्ते व आदींनी अभिनंदन केले आहे.

## लाख रुपये नुकसान भरपाई, शंभर टक्के पीक विमा लागू करा–भाई नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा प्रचंड फटका बसलेला असून शेतकऱ्याचे संपूर्ण पिके अतिवृष्टीमुळे गेले असल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असताना कृषी मंत्री पाहणीचे आणि पंचनाम्याचे नाटक करत आहेत, वास्तविक अतिवृष्टीमुळे शेतकरी शंभर टक्के उध्वस्त झालेला असताना शेतकऱ्यांना लाख रुपये नुकसान भरपाई देऊन १००% पीक विमा लागू करण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने माजलगाव तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली.



शंभर इशारा शेकडो कार्यकर्त्यांनी तहसील समोर प्रचंड घोषणाबाजी केली व शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध केला, शेतकऱ्यांच्या नुकसानीची एकरी लाख रुपये नुकसान भरपाई व १००% पीक विमा लागू न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती समिती सदस्य भाई ॲड नारायण गोले पाटील, तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ, भाई चांगदेव शेजुळ, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष अशोक बाप्पा कुलकर्णी, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका चिटणीस भाई आनंत चव्हाण, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका सहचिटणीस भाई राहुल सोळंके भाई सतीश शेजुळ,भाई राधाकृष्ण पांचाळ, भाई श्रीराम शेवाळे, शेतकरी सभेचे तालुका अध्यक्ष भाई सुदाम चव्हाण, शेतकरी सभेचे तालुका चिटणीस भाई माऊली चंदनशिव, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई विष्णू शेळके, भाई भास्कर कांबळे, भाई राजेभाऊ शेरकर आदी उपस्थित होते होते.

## परळी पोलिस ठाण्यासमोर सकल मुस्लिम समाजाकडून ठिय्या आंदोलन



परळी । प्रतिनिधी

आज परळी येथे सकल मुस्लिम समाजाकडून परळी पोलिस ठाणे येथे नितेश राणेवर गुन्हा दाखल करा या मागणीसाठी दुपारी १२:३० वाजे पासून पोलीस ठाणे समोर ठिय्या आंदोलन करण्यात आले आहे. रामगिरी महाराज यांनी अखंड हरिनाम सप्ताह मौजे पचाळे ता. सिन्नर जि. नाशिक याठिकाणी सुरु असलेल्या सप्ताहाचे प्रवचन चालु असतांना उपस्थित असलेल्या सर्व लोकांसमक्ष लाईव्ह प्रक्षेपण असतांना असे सांगीतले की, ''आज भारतामध्ये एक कोटीपेक्षा मुस्लीमांचा जास्त आकडा आहे की, त्यांनी इस्लाम सोडला आहे. दहा वीस वर्ष जे मौलाना म्हणून जे राहिले आहे. त्या इस्लामचा सुक्ष्म अभ्यास केला त्यावेळी त्यांचे लक्षात आले की, अन्याय अत्याचार शिवाय या मध्ये काही नाही. म्हणून त्यांनी धर्म सोडुन दिला आहे.

तसेच मी इस्लाम धर्म मानीत असतांना मला असे एकविण्यात आले की, 'मोहम्मद पैगंबर यांचे जिवन चरित्र एकविण्यात आले असता त्यांचे पन्नासव्या वर्षी एका सहा वर्षीय मुलीसोबत विवाह करतो. आयेशा ज्यांचा नाय आहे. जो मनुष्य त्यांचे आदर्श असे आहेत ते कसे वागवतील आणि त्या मुस्लीम धर्मामध्ये ज्या स्त्रिया वरती जे अत्याचार घडतात त्यांचे आदर्शच अत्याचारी होते त्यांचे ऐकुण काही सांगायचे कारण नाही. कारण वस्तुस्थिती अशी आहे. आजच्या काळामध्ये आज भारतात एक कोटी मुस्लीमांनी त्यापेक्षा जास्त मुस्लीमांनी इस्लाम धर्म सोडलेला अशी माहिती प्रवचन मध्ये दिली मुस्लिमांना स्वतःच्या जीव प्रेषित मुहम्मद पैगंबर यांचा सम्मान महत्वाचा असल्याने रामगिरीची व्हीडीओ क्लीप व्हायरल होताच संपुर्ण देश भरात मुस्लिम समाज तर्फे निषेध मोर्चे अनेक ठिकाणी महाराजवर सुद्धा दाखल झालेली आणि त्याला अटक करण्याची मागणी जोर धरत आहे एका आरोपीच्या समर्थनार्त १ सप्टेंबर २०२४ रोजी भाजप आमदार नितेश राणे यांनी श्रीरामपूर अहमदनगर जिल्ह्यात सकल हिंदू समाज आयोजित एका मोर्च्यात आ.नितेश राणेनी भाषणात मुस्लिम समाजाला टार्गेट करत शिविगाळ केली तसेच धमकी दिली आहे ''मस्जिदों में आकर चुन-चुनकर मारेंगे'' या मुळे मुस्लिम समाजात रोष असुन समाजाचे भावना दुखावले आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था चा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून नेहमी जातीय-धार्मिक तेढ वाढेल अशी प्रक्षोभक बेताल वक्तव्य तो जाणूनबूजून करत आहे. न्यायाच्या दृष्टीने आमदार नितेश राणेवर भारतीय न्याय संहिता( बीएनएस) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात यावा या मागणीसाठी ठिय्या आंदोलन करण्यात आले होते

## गणेशोत्सवानिमित्त भव्य ढोल ताशा वाद्य पथक स्पर्धांचे आयोजन

अंबाजोगाई। प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने गणेशोत्सवा निमित्ताने ढोलताशा वाद्य पथकांच्या भव्य अशा खुल्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्या आहेत .या ढोलताशा वाद्य पथक स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त ढोलपथक संघांनी सहभागी होऊन स्पर्धेचा आनंद घ्यावा असे आवाहन संयोजक संकेत राजकिशोर मोदी यांनी केले आहे. ही स्पर्धा रविवार दि १४ सप्टेंबर २०२४ रोजी शहरातील रिलायन्स पेट्रोल पंपासमोरील शंकर महाराज वंजारी वसतिगृहाच्या मैदानात सकाळी ११:३० वाजता संपन्न होतील असेही संकेत मोदी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

सांस्कृतिक अंबाजोगाई शहरात प्रियदर्शनी क्रीडा मंडळ हे संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली मागील ३५ वर्षांपासून शहरात विविध क्रीडा, सांस्कृतिक , शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करून अंबाजोगाई शहर व परिसरातील युवकांना एक खुले व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. मंडळाच्या उपक्रमातील एक भाग म्हणून शहरातील सर्व गणेश मंडळांच्या ढोल ताशा पथकांच्या वादयस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अंबाजोगाई शहरात १०० च्या जवळपास गणेश मंडळ कार्यरत आहेत. या गणेश मंडळासाठी संकेत राजकिशोर मोदी यांच्या संकल्पनेतून गणेशोत्सवानिमित्त ढोल ताशा वाद्य पथकांच्या भव्य अशा खुल्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असून या स्पर्धेत प्रथम क्रमांक रुपये २१००१/-, द्वितीय क्रमांक रुपये१५००१/-, तृतीय क्रमांक रुपये ११००१/-, तर उत्तेजनार्थ रुपये ५००१/- व स्मृतिचिन्ह अशा बक्षिसांची लयलूट प्रियदर्शनी क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. वैयक्तिक बक्षीसमध्ये उत्कृष्ट ढोल वादक तसेच उत्कृष्ट ताशा वादक यांना देखील स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे. तेव्हा या नाविन्यपूर्ण अशा स्पर्धेत शहरातील जास्तीत जास्त गणेश मंडळाच्या ढोल ताशा वाद्य पथकांनी आपला सहभाग नोंदवावा असेही आवाहन संकेत मोदी यांच्या वतीने करण्यात आले आहे. प्रियदर्शनी क्रिडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने मागील ३५ वर्षांपासून अंबाजोगाई तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी बाल झुंबडचे यशस्वी आयोजन करण्यात येत आहे. बाल झुंबड द्वारे अनेक शालेय विद्यार्थ्यांना खुल व्यासपीठ उपलब्ध होऊन त्याद्वारे अनेक मोठी कलावंत निर्माण झाली आहेत.

## आ.निलेश राणेवर कारवाई करा; पाटोदा सकल मुस्लिम समाजाची निवेदनाद्वारे मागणी

पाटोदा। प्रतिनिधीफ

आ.निलेश राणे यांची जीभ पुन्हा घसरली असुन मुस्लिम समाजा विषयी केलेल्या वक्तव्यावरून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी होत असुन पाटोदा मुस्लिम सकल समाजाच्या वतीने पोलीस निरीक्षक श्री.अनमोल केदार यांच्या मार्फत महाराष्ट्र शासनाला आ.राणेवर तात्काळ कारवाईची मागणी करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,



भाजपा आ.निलेश राणे हा नेहमी मुस्लीम समाजा बाबत नकारात्मक विधाने करीत आहे दि.१/९/२०२४ अहमदनगर येथे मुस्लिम समाजाच्या प्रेषितांच्या विरोधात वादग्रस्त वक्तव्य करणारे रामगिरी महाराजांच्या समर्थनात आयोजित बैठकीत आ.निलेश राणे यांनी मुस्लीमांना मस्जीदमध्ये घुसून मारू असे वादग्रस्त विधानं केले असुन तसेच आ.निलेश राणे हे नेहमी मुस्लिम समाजा विरोधात वादग्रस्त व चिथावणीखोर वक्तव्य करत असतो त्याने विधानसभा समोर ठेवून हिंदु मुस्लीम दंगे घडवाण्याचे नियोजन दिसून येत आहे तरी आ.निलेश राणे व त्यांच्या कुटुंबाचा बंदोबस्त पोलीस प्रशासन व महाराष्ट्र शासनाने करावा नसता पाटोदा शहर मुस्लिम समाजाच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असे म्हटले आहे.या निवेदनावर मोसिन शेख,जावेद शेख,मोहीद शेख,हमीदखान पठाण, भाई विष्णुपंत घोलप,वाजेद कुरेशी,आकिब शेख,शेख अराफत,असलम पठाण, माजेद पटेल,आयुब पठाण, शेख जमील,सय्यद लतिफ,शेख मसरूद्दीन,शेख खलिल,शेख सुलेमान आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/५६१
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०२/०८/२०२४

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १)साईनाथ बाबुराव काळे , २)पल्लवी साईनाथ काळे दोघे रा. शिवाजी नगर गारखेडा परिसर, छ. संभाजीनगर प्रकरण : सर्वे नं. ४५४/१ प्लॉट नं. ४०, सि.स.नं. २९६६/४० न.प.गि.नं.१८-१६७-४० चे हस्तांतरण करणे बाबत


सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१६७-४० ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व-०९ मीटर रुंदिचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : प्लॉट नं. ४१
दक्षिण : प्लाट नं. ३९
उत्तर : १२ मीटर रुंदिचा कॉलनी अंतर्गत रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

## माजलगांव येथील मजुरांचे थकीत वेतन तात्काळ द्या– गणेश थोरात

माजलगाव। प्रतिनिधी



येथील फलरोप वाटिका व तालुकाबीजगुणन केंद्र माजलगाव येथील मजुरांचे थकीत वेतन तात्काळ देण्यात यावे नसता आयुक्त कृषी आयुक्त कार्यालया पुणे समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा गणेश थोरात व बाबासाहेब पवार यांनी येथील उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनातुन दिला आहे गणेश गंगाधरराव थोरात , बाबासाहेब मारोती पवार व तुकाराम कोंडीबा निसर्गंध यांनी दि २८ ऑगस्ट २०२४ रोजी मा. आयुक्त (कृषी) कृषी आयुक्तालय साखर संकुल परिसर शिवाजी नगर पुणे -५ यांना कृषी अधिकारी कृषि चिकीत्सालय फळरोप वाटिका व तालुका बिजगुणकेंद्र माजलगांव यांच्या मार्फत निवेदन दिले आहे. त्यात म्हंटले आहे की येथील दैनदिन मजुराचे सन २०२२- २३ मधील प्रलंबीत (कालबाह्य) देयके व तसेच माहे - फेब्रुवारी २०२४ पासूनची प्रलंबीत देयके इत्यादी प्रलंबीत असल्याने ऐन सणासुदीला मजुरावर उपासमारीची वेळ आलेली आहे. वेतन अदा न केल्यास दि २० सप्टेंबर २०२४ च्या नंतर आपल्या कार्यालयाकडे आमरण उपोषणास कधीही केव्हाही बसु त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलया कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी असं दिलेल्या निवेदनात गणेश थोरात , बाळासाहेब पवार व तुकाराम कोंडीबा निसर्गंध यांनी म्हंटले आहे

**मा.श्री.ए.एस.जगताप, दिवाणी न्यायाधीश साहेब (क. स्तर) शिरुर (का) यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. २९२/२०२४**

अर्जदार : १) सविता भ्र.शरद टाक (विवाहानंतरचे नांव) बेबी पि.दिंगाबर बेद्रे (विवाहापुर्वीचे नांव) वय-४५ वर्षे, धंदा-नौकरी, रा. खोकरमोह ता. शिरुर (का) जि.बीड २) ऋषिकेश पि. शरद टाक, वय-२६ वर्षे, धंदा-नौकरी, रा. सदर ३) गौरी पि.शरद टाक, वय १६ वर्षे, धंदा-शिक्षण अज्ञान अ.पा.क.आई अर्जदार क्रं. १, रा. सदर ४) छगन पि. लक्ष्मण टाक, वय-७६ वर्षे, धंदा-सेवानिवृत्त, रा. सदर ५) साखरबाई भ्र. छगनराव टाक, वय-७४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर

**विरुध्द निरंक**

दावा :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत शरद पि. छगनराव टाक यांचा मृत्यू झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत शरद पि. छगनराव टाक यांचा मृत्यू दिनांक ३०-०६-२०१४ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत शरद पि.छगनराव टाक यांच्या मृत्यूनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येत की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शरद पि. छगनराव टाक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/९/२०२४ रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १६/१०/२०२४ आहे.

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, (क.स्तर) शिरुर (का)

शिक्का

ॲड.व्ही.एस. मिसाळ

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१९६/२०२४**

**तुकाराम अंतराम काशिद विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**

**तुकाराम अंतराम काशिद रा.साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत देवराव बापु काशिद** यांचा दिनांक १५/०८/१९४५ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ३०/०८/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०९/२०२४ ही आहे.**

मार्फत
**ॲड. मिलिंद उबाळे**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

# दरेकर नानांनी आपल्या राजकीय आयुष्यात पैसे नाही तर माणसं कमावली

आष्टी । प्रतिनिधी

सध्याचे राजकारण हे सुडाच्या दिशेने वाटचाल करणारे असले तरी नानांनी त्यांच्या आयुष्यात मैत्रीत राजकारण कधीच सुडाचे राजकारण केले नाही राजकारण असो की समाजकारण जे ओठात तेच पोटात असणारे स्वच्छ व स्पष्ट नेतृत्व म्हणजे नाना आहेत. त्यांनी पैशाला महत्त्व देता माणसें कमावली सामान्यांशी असलेली नाळ कशी टिकून ठेवाययची हे नानांकडून शिकण्यासारखे आहे. त्यामुळेच नाना राजकीय वर्तुळातील एक अजातशत्रू व्यक्तिमत्व असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरदचंद्र पवार) गटाचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांनी केले. आष्टीचे माजी आमदार साहेबराव दरेकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी आष्टी, पाटोदा, शिरुर तालुक्यातून आलेल्या हजारो चाहत्यांनी साहेबराव दरेकर यांना पुष्पगुच्छ देऊन




## शुभेच्छांच्या गर्दीवरुन जाणुन आले

शुभेच्छांचा वर्षाव करीत नानांचे अभिष्टचिंतन केले.

पुढे बोलताना महेबुब शेख म्हणाले की, राजकारणात संबंध कसे जपून ठेवावेत. हे नानांना शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या चाहत्यांच्या उपस्थितीवरुन पाहायला मिळते. आमदार असो किंवा नसो जनतेवर तितकच प्रेम करणारे असामान्य नेतृत्व म्हणजे नाना आहेत. या वयातही त्यांचा काम करण्याचा उत्साह पाहिला तर तरूणाईला लाजवणारा आहे. सध्या विधानसभेची निवडणूक जवळ आल्यामुळे राजकारण चांगलेच तापू लागल्यामुळे इच्छुकांची संख्या मोठी वाढली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून अनेकजण इच्छुक आहेत. त्यामध्ये नाना आणि मी देखील इच्छुक आहे. मात्र पवार साहेब ज्यांना कुणाला उमेदवारी देतील, त्या उमेदवाराला अधिकाधिक मतानं विजयी करण्यासाठी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते एकदिलाने प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे शेख यांनी सांगीतले.

याप्रसंगी हभप आदीनाथ आंधळे महाराज, हभप बबन महाराज बहिरवाल, माजी मंत्री शिवाजीराव पंडीत, माजी आमदार भीमराव धोंडे, जनार्दन तुपे, प्रा शशीकांत गाडे, वंचित आघाडीचे जिल्हाध्यक्ष अशोक हिंगे, माजी जिप सदस्य देवीदास धस, रामभाऊ खाडे, अण्णासाहेब चौधरी, किशोर हंबर्डे, अमोल तरटे, डॉ मधूकर हंबर्डे, सुखलाल मुथ्था, डॉ नदीम शेख, विक्रम पोकळे, राहूल काकडे, रिजवान शेख, मधू सायंबर, ठकाराम दुधावडे, विष्णूपंत घोलप, सागर आमले, नवनाथ आटोळे, सुनील सुर्यवंशी, केशव चव्हाण, संजय साके, बिपीन भंडारी, लक्ष्मण नन्नवरे, काकासाहेब सोनवणे, शिवभूषन जाधव, प्रदीप चव्हाण, सुभाष सोनवणे,प्रा झांजे, मनोज गाढवे, गंगाधर आजबे यांच्यासह अष्टी,पाटोदा व शिरुर तालुक्यातील दरेकरांचे चाहते पदाधिकारी, कार्यकर्ते हजारोच्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय थोरवे यांनी केले. सुत्रसंचालन सिध्देश्वर शेंडगे, अमोल जगताप यांनी तर उपस्थितांचे आभार माजी शिक्षण सभापती उध्दव दरेकर यांनी मानले.

### आमचं बंधुत्वाचं नातं....

राजकारणाच्या आखाड्यात दरेकर नानांच्या आमच्या दिशा जरी वेगवेगळ्या असल्या तरी आमच्यात पंचेचाळीस वर्षापासून अजूनही बंधुत्वाचं नातं आहे. राजकारणाच्या पलीकडे आमची दोघांची मैत्री आहे. आम्ही अनेक वर्षे सोबत काम केले. पण मैत्रीत कधीच राजकारण केले नाही. यावेळी धोंडेंनी नानांना पोषाख प्रदान अभिष्टचिंतन केले.

–माजी आ. भीमराव धोंडे

### राजकारणातील परीस...

आष्टीच्या राजकारणात स्वच्छ अन्? स्पष्टवक्ता म्हणून माजी आ साहेबराव दरेकरांचा नावलौकिक आहे. राजकीय प्रवासात आजपर्यंत नानांनी किंगमेकरची भूमिका साकारलेली. त्यांच्या स्पर्शाने अनेकांचे सोने झाल्यामुळे नाना म्हणजे राजकारणात लोखंडाचे सोने करणारा परीस आहेत.

–खा. निलेश लंके (अ.नगर)

# श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात पर्यावरण पूरक गणेश मूर्ती कार्यशाळा संपन्न

माजलगाव प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात पर्यावरण पूरक गणेश मूर्ती कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे सर, प्रमुख अतिथी माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, तर प्रशिक्षक श्रीमती नेहा काळे, सुरेश देशपांडे, गणेश विभुते तर व्यासपीठावर विभाग प्रमुख रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, पर्यवेक्षक परमेश्वर आदमाने इत्यादी उपस्थित होते.



यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रशांत भानप यांनी सांगितले की, या पर्यावरण पूरक गणेश मूर्ती कार्यशाळेच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणासाठी महत्वाचे योगदान आपले राहणार आहे तसेच विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सृजनशीलतेला व्यासपीठ मिळवून देण्याचा हा कला विभागाचा स्तुत्य उपक्रम आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनेतून साकारलेल्या गणेश मूर्ती ची स्थापना आपापल्या घरी करून पर्यावरण रक्षणाचा संदेश शहराच्या विविध भागांत पोहोचणार

पान ३ वर

# मोटार सायकलची समोरासमोर धडक ;एक ठार

चौसाळा । प्रतिनिधी

येथून जवळ असलेल्या घारगाव ता बीड येथे दोन्ही मोटार सायकल स्वराची समोरासमोर धडक होऊन या धडकेत शेषेराव किसन ढास वय ४० या तरुणाचा जागीच मृत्यू झाला तर दुसऱ्या तरुणांस जब्बर मार लागल्याची घटना दि ३ सप्टेंबर रोजी करी च्या सना दिवशी रात्री घडली सदर प्रकरणी माहिती अशी की घारगाव येथील मयत शेषेराव किसन ढास हा तरुण मोटार सायकल वरून आपल्या घराकडे घारगाव गावी जात होता समोरून येणाऱ्या मोटार सायकल स्वार दादाराव काशिनाथ जाधव हा घारगाव वरून येत असताना या दोन्ही मोटार सायकल ची लक्षुमन दादा नामक पुला मध्ये दोघांची समोरासमोर जोराची धडक होऊन या मध्ये शेषेराव ढास याचा मृत्यू झाला तर दादाराव जाधव हा जब्बर जखमी झाला दादाराव जाधव वय ४५ हा जब्बर जखमी झाला मयत शेषेराव ढास यांच्या मागे पत्नी दोन मुले दोन मुली असा परिवार आहे त्याच्या मृत्यू बाबत हळहळ व्यक्त केली जाते.

# गणेश व्याख्यानमालेचे आयोजन योगेश्वरी शिक्षण संस्थेचा उपक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही ८ ते १६ सप्टेंबर या कालावधीत गणेश व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष मा.चंद्रशेखर बर्दापूरकर व सचिव कमलाकर चौसाळकर यांनी दिली.

व्याख्यानमालेत दि. ०८ सप्टेंबर रोजी पुणे येथील प्रा.डॉ.श्रीरंजन अवटे हे संविधान भान हा विषय मांडणार आहेत. ०९ सप्टेंबर रोजी पुणे येथील कर्नल. गिरीधर कोले हे कारगिल युद्धातील स्वानुभव या विषयी भाष्य करणार असून, १० सप्टेंबर रोजी पुणे येथील डॉ. नितीन हंडे हे आपले भवताल, आपले ब्रम्हांड याविषयी आपले विचार मांडतील. १२ सप्टेंबर रोजी जळगाव येथील प्रा.अश्विन झाला हे अध्यात्म आणि विज्ञान या विषयी बोलणार आहेत,१३ सप्टेंबर रोजी, लातूर येथील प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे हे भारतीय कृषि व पशुपालन संस्कृती– काल आज आणि उद्या या विषयावर मनोगत व्यक्त करतील. अहमदनगर येथील डॉ. भूषण कुलकर्णी, हे १४ सप्टेंबर रोजी कृत्रिम बुद्धिमत्ता याविषयी तर,१५ सप्टेंबर रोजी डॉ.नागेश टेकाळे, मुंबई हे निसर्ग संवर्धनामध्ये लोकसहभागाचे महत्व या विषयावर मनोगत व्यक्त करतील. प्रा.डॉ. वसंत गिरी,बुलढाणा हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सशस्त्र क्रांतीकारकांचे योगदान या विषयाने व्याख्यानमालेचा समारोप करतील.

योगेश्वरी महाविद्यालयतील नागापुरकर सभागृहात सायं ६.३० वा.

पान ३ वर

# भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या शास्त्रज्ञांची बीड जिल्ह्यात भेट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर येथील शास्त्रज्ञ डॉ. अंगामूथू मनीकंदन व डॉ. निळकंठ हिरामणी यांनी दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई येथे भेट दिली. कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध पीक तंत्रज्ञान प्रात्यक्षिक व कृषी विस्तार कार्यक्रमांची पाहणी त्यांनी केली. परळी तालुक्यातील दौनापूर गावात भेट देवून सघन कापूस प्रात्यक्षिकाला भेट देवून 'एक



गाव, एक वाण' मोहिमेची माहिती घेतली. तसेच दौनापूर गावातील कुक्कुटपालन, शेळीपालन, तूर समूह दर्शनी प्रात्यक्षिक, चारा उत्पादन व रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसोबत सविस्तर चर्चा केली. सरपंच राजेश आघव यांनी दौनापूर गावात राबविण्यात आलेल्या प्रात्यक्षिकांची माहिती दिली. अंबाजोगाई तालुक्यातील गोंदणपट्टी तांडा येथे भेट देऊन ऊसतोड महिला गटाच्या बाजरी खारवडी कामाची माहिती घेतली. नैसर्गिक धागा–सिमेंट द्वारे निर्मित जमिनीखालील १०००० लीटर क्षमतेच्या पाणी साठवण हौदाची पाहणी करून लाभार्थी शेतकरी यांच्याशी चर्चा केली. मांडवा (पठाण) गावातील नितीन रुद्राक्ष या युवा शेतकऱ्याच्या अवजारे सेवा केंद्र

पान ३ वर

# सलमान शेख यांची एसआरपीएफ पोलिस म्हणून निवड

## मोल मजुरी करणाऱ्या आई–वडीलांच्या कष्टाचे केले चीज

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील शादुल शेख व त्यांची पत्नी रिहानबी हे मुळचे नांदेड जिल्ह्यातील रहिवासी परंतु मोलमजुरीसाठी सुलेमान देवळा येथे गेल्या काही वर्षांपासून स्थायिक झाले त्यांना पाच मुली त्यांच्या पाठीशी सलमान हा मुलाचा जन्म झाला मोलमजुरी करुन कसे बसे या मुलींचे लग्न लावून देऊन दररोज काम केलं तर यांची चुल पेटायची अशी काही या कुटुंबाची अवस्था होती त्यात शादुल शेख यांचा अल्पशा आजाराने मृत्यू झाला आता



कुटुंबाचा सर्व भार हा पत्नी रिहानबी यांच्यावर पडला कसा बसा मोलमजुरी करून मुलगा सलमान याचा उदरनिर्वाह केला सलमान मोठा होताच त्याला देखील वाटु लागले की आता आपण मोठे झालो असुन कामात आईला हातभार

पान ३ वर

# नितेश राणेची आमदारकी रद्द करा -ॲड.जब्बार पठाण

## उठसूठ बेताल वक्तव्य करून राणेंनी वातावरण बिघडवू नये

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांची देवाण घेवाण करणारे राज्य आहे या ठिकाणी अठरा पगडा जाती धर्म पंथाची लोक गुण्या गोविंदाने नांदत आहेत . मात्र नितेश राणे यांच्या सारख्या काही नेत्यांमुळे महाराष्ट्राचा सलोखा दुभंगत चालला आहे जाती जातीत तेढ निर्माण होईल अशी बेभान वादग्रस्त वक्तव्य करून नितेश राणे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न करत आहे आणि सारखेच अशी वक्तव्य करण्याची मालिका त्याची सुरूच आहे . हा सारखा सारखा मुस्लिम समाजाला केंद्र बिंदू ठेवत द्वेष पूर्ण भाषण देत असतो त्यामुळे नितेश राणे याला कायद्याचा धाक आहे का नाही हे प्रश्न निर्माण होत आहे रामगिरी महाराज च्या वक्तव्याने मुस्लिम समाजात प्रचंड रोष निर्माण झालेला असताना या रामगिरी महाराजा विरुद्ध काही बोलाल तर याद राखा असे चिथावनी देणारे वक्तव्य सारखेच होत आहे या मुळे मुस्लिम समाजाच्या भावना वारंवार दुखावल्या जात आहेत कोणत्या ना कोणत्या कारणाने नितेश राणे मुस्लिम समाजा बद्दल गरळ ओकून मुस्लिम समाजाच्या भावनांना इजा पोहोचण्याचा प्रयत्न करतो आहे नितेश राणे



पान ३ वर

# रयतच्या श्री गणेश विद्या मंदिर शाळेच्या ४ विद्यार्थ्यांची एमबीबीएससाठी निवड

अंमळनेर । प्रतिनिधी

अंमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदिर व कै. प्रशांत तुकाराम पोकळे कनिष्ठ महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांची एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.अंमळनेर (भांड्याचे) येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदिर शाळेचे विद्यार्थी सुरज सुग्रीव पोकळे (शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,संभाजीनगर), वैभव चिंतामण राख (नायर हॉस्पिटल, मुंबई), तेजस शहादेव पोकळे (प्रकाश इन्स्टिट्यूट,सांगली) व




कु.अनुजा सुग्रीव पोकळे (डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल,अहमदनगर) ह्या विद्यार्थ्यांची एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. शाळा

पान ३ वर

# सुरूडी आश्रम शाळेचे सुधाकर राठोड यांना 'कर्तृत्ववान शिक्षक पुरस्कार' जाहीर

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजी नगर अंतर्गत सुधाकर प्रभू राठोड मुख्याध्यापक शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सुरुडी ता.आष्टी जि.बीड यांना शिक्षक ध्येय यांच्या कर्तृत्वान शिक्षक, मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर. शिक्षक ध्येय, सृजन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, मुक्रमाबाद, ता. मुखेड, जि. नांदेड, हिंद एज्युकेशन सोसायटी दापोली जि. रत्नागिरी आणि मिलिंद दीक्षित, उपसंपादक, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील शिक्षक, मुख्याध्यापकांसाठी 'कर्तृत्ववान शिक्षक,मुख्याध्यापक पुरस्कारा'साठी राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण उपक्रम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'ना नफा ना तोटा' या तत्वावरील या स्पर्धेमागे शैक्षणिक कामाला प्रोत्साहन देणे हाच मुख्य उद्देश होता. शैक्षणिक कामात केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती राज्यातील इतर सर्व शिक्षकांना व्हावी याच हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी केलेल्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोगाच्या आधारावर निवड केली गेली. मुकुंद दहिफळे, अधिव्याख्याता, जिल्हा



पान ३ वर

# शासनाच्या आदेशाला अनेक शाळांकडून केराची टोपली

माजलगाव । प्रतिनिधी

प्राथमिक वयोगटातील मुलांची झोप व्यवस्थित व्हावी यासाठी शासनाने प्राथमिक शाळेच्या वेळेबाबत रीतसर परिपत्रक काढले असताना देखील माजलगाव मधील अनेक शाळा या सकाळच्या सत्रातच भरवण्यात येत असून यात संस्थाचालकांची मनमानी दिसून येत आहे.शासनाने काढलेल्या आदेशाला केराची टोपली दाखवण्याचे काम शाळेकडून होत आहे.

प्राथमिक वयोगटातील पाल्याची झोप व्यवस्थित होत नसल्याने त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे असे माननीय राज्यपाल यांनी मत व्यक्त केले होते त्यांच्या सुचनेवरून शासनाने प्राथमिक शाळा ही सकाळी ९ नंतर भरवण्यात यावी असे परिपत्रक काढले होते त्यानुसार अनेक प्राथमिक शाळा यांनी आपल्या वेळेत बदला करत या दुपारच्या सत्रात भरवण्यात येत आहेत परंतु काही मुजोर संस्थाचालकाच्या मुजोरीमुळे शासनाच्या या आदेशाला हरताळ फसण्याचे काम केले असून शहरातील संस्थेच्या प्राथमिक शाळेच्या वेळेत बदल करण्यात आला नाही याकडे गटशिक्षण अधिकारी कार्यालयाचे सुद्धा दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे या शैक्षणिक सत्राचे दोन महिने उलटून देखील वेळेत बदल न झाल्याने सदरील कार्यालयाचा ढिसाळ कारभारचा प्रत्यक्ष अनुभव येत आहे.माजलगाव शहरात संस्थेच्या अनेक प्राथमिक शाळा आहेत वेळेत बदल न करणाऱ्या शाळेवर कारवाई ची मागणी पालक वर्गातून होत आहे.

## प्राथमिक शाळा आणखी सुद्धा भरतात सकाळच्या सत्रात

## शहरात अनेक शाळा या सकाळच्याच सत्रात भरतात

काय म्हणाले होते राज्यपाल..

राज्यातील सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनांच्या शाळांपैकी काही शाळा विशेषतः खाजगी शाळा भरण्याच्या वेळा या साधारणपणे

पान ३ वर

# अतिवृष्टीत पडलेली गरिबांची घरे बांधण्यासाठी घाटगे यांच्याकडून मदत

जालना । प्रतिनिधी

जिल्हाभरात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अनेक गावात घरांची पडझड झाली. कारला गावात वादळी पावासामुळे अनेक गरिब कुटुंबाची घरे कोसळ्याने त्यांचा संसार उघड्यावर आला. या कुटुंबाची घरे उभे करण्यासाठी भाजपा नेते तथा समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी पुढाकार घेत त्यांनी आर्थिक मदत केली आहे.

मजुरी करून पोट भरणाऱ्या आणि उरलेल्या पैशात तीन मुलांचा जबाबदारी सांभाळणाऱ्या जालना



तालुक्यातील कारला येथील मीनाताई गवळी याचं घर अतिवृष्टीत उध्वस्त झाल. पतीच्या अकाली जाण्याने त्या एकट्याच मजुरी करून आपल्या तीन मुलासोबत राहतात. अतिवृष्टीत त्याचं मातीच घर कोसळल आणि त्यांचा संसार उघड्यावर आला. या संकटात त्यांच्यासोबत सतीश घाटगे खंबीरपणे उभा राहिले. त्यांचा संसार पुन्हा उभा करण्यासाठी सतीश घाटगे यांनी कारला गावात येऊन त्यांना धीर दिला. आपली बहीण मानून पडलेलं घर बांधून देण्यासाठी त्यांना आर्थिक मदत केली. तसेच याच गावातील शकुंतला दिलीप कावळे यांचे देखील घर अतिवृष्टीत पडले. त्यांनाही सतीश घाटगे यांनी घर पुन्हा उभा करण्यासाठी आर्थिक मदत केली. या मदतीबद्दल गावकऱ्यांनी व बाधित कुटुंबांनी सतीश घाटगे यांचे आभार मानले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पाणी पुरवठ्याच्या 'एनओसी'चे बंधन काढले

**पुणे । प्रतिनिधी**

बांधकाम परवानगीचे अधिकारी पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाकडे (पीएमआरडीए) असलेल्या, परंतु महापालिकेच्या हद्दीत असलेली २३ गावे, तसेच प्राधिकरणाच्या हद्दीतील महापालिका व नगरपालिकांच्या हद्दीपासून पाच किलोमीटर अंतरावरील बांधकामांना परवानगी देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या भागात बांधकाम प्रकल्पांना परवानगी देताना पाणी पुरवठ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) सादर करण्याचे विकसकांवर असलेले बंधन रद्द करण्याचा निर्णय पीएमआरडीएने घेतला आहे.

पाण्याची उपलब्धता असल्याशिवाय बांधकामांना परवानगी नाही, असा निर्णय यापूर्वी पीएमआरडीएने घेतला होता. त्यासाठी बांधकाम व्यावसायिकांनी स्वत: पाणी पुरवठा करण्यासंदर्भात हमी अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून तसे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर केल्यानंतरच ही परवानगी दिली जात होती. वास्तविक कायद्यात कोणतीही तशी तरतूद नसताना पीएमआरडीएने नागरिकांचे करण पुढे करीत हा आदेश काढला होता. त्यावर बांधकाम क्षेत्रातून विरोध झाल्यानंतर प्राधिकरणाने घुमजाव करीत सुधारित आदेश काढले आहेत. या सुधारित आदेशामुळे आता महापालिका आणि नगरपालिकांकडून पाणी पुरवठा करण्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर न करताही बांधकाम परवानगी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महापालिका अथवा नगरपालिका हद्दीपासून पाच किलोमीटर अंतराच्या परिसरात पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. तसेच आदेश राज्य सरकारचे आहेत. त्यामुळे सदर क्षेत्रात सर्व नवीन अथवा सुधारित बांधकाम प्रकल्पांना परवानगी देताना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्याची गरज नाही. त्यामुळे प्राधिकरणातील विकसनशील भाग असलेल्या २४२ गावांतील शेकडो नागरिकांसह बांधकाम व्यावसायिकांना याचा लाभ मिळणार आहे, असे प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी सांगितले.

२४२ गावांव्यतिरिक्त उर्वरित क्षेत्रात बांधकामांना परवानगी देताना सक्षम सार्वजनिक प्राधिकरणामार्फत मिळणार असल्याचे पाणीपुरवठा प्रमाणपत्र द्यावे लागणार आहे. ते असल्यास अशा बांधकाम प्रस्तावांना मंजुरी मिळेल. पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व एमआयडीसीची पाणीपुरवठा योजना अशा यंत्रणांमार्फत त्या-त्या भागाला पाणीपुरवठा करण्याचे प्रमाणपत्र असेल किंवा ज्या प्रकल्पाच्या जागेवर विहीर अथवा बोअरवेल असेल, अशा बाबतीत भूजल सर्वेक्षण आणि विकास संस्थांकडून प्रत्यक्षात उपलब्ध होणारे पाणी पडताळणी प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर झाले असल्यास त्यांना मंजुरी देण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याकरिता ज्या गृहप्रकल्पांचे प्रस्ताव दाखल आहेत किंवा ज्यांना भोगवटा मिळालेला आहे, अशा प्रकल्पांमध्ये निर्माण झालेला त्रयस्थ हितसंबंध व महारेराची कालमर्यादा विचारात घेता पूर्व बांधिलकी विचारात घेऊन त्यांना मान्यता देण्यात येणार आहे. तसेच, अशी प्रकरणे प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीकडे पाणीपुरवठा योजना तयार करण्यासाठी अभियांत्रिकी विभागाकडे सादर करण्यात येणार आहे, असेही प्राधिकरणाकडून सांगण्यात आले.

## हडपसर मतदार संघ भाजपलाच मिळावा !
## मतदार संघातील पदाधिकारी व कार्यकर्ते आग्रही

**हडपसर । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीत हडपसर विधानसभा मतदार संघ हा भाजपलाच मिळावा आणि स्थानिक उमेदवार असावा, अशी विधानसभा क्षेत्रातील काही भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मागणी आहे. त्याबाबत काही पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर मागणी केली आहे. तर काही पदाधिकारी शहरअध्यक्ष यांच्याकडे हा मतदार संघ भाजपलाच मिळावा या मागणीच्या तयारीत आहेत.

भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार अशी महायुती आहे.यात हडपसर विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे चेतन तुपे हे विद्यमान आमदार आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून शहर प्रमुख नाना भानगिरे हे इच्छुक आहेत. तर ,गेल्या विधानसभा निवडणुकीत पराभव झालेल्या भाजपच्या योगेश टिळेकर यांची नुकतीच विधानपरिषद सदस्य म्हणून वर्णी लागली आहे. त्यामुळे महायुतीत हा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे राहील अशी अटकळ बांधली जात असतानाच आता येथील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हडपसर विधानसभा मतदार संघ भाजपलाच मिळावा, अशी आग्रही भूमिका



घेतली आहे. गेल्या आठवड्यात मतदार संघातील भाजपच्या काही पदाधिकाऱ्यांनी पक्षातील वरिष्ठ पदाधिकारी व नेतेमंडळी यांची भेट घेतली आहे. तर, मंडल अध्यक्षांसह काही पदाधिकारी शहर अध्यक्ष यांना भेटून हा मतदारसंघ भाजपलाच सोडावा अशी मागणी करण्याच्या तयारीत आहेत. हडपसर विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या काही पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेल्या भावना

सन २०१४ पूर्वी मतदारसंघात भाजपची हवी तेवढी ताकद नव्हती. मात्र, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत योगेश टिळेकर हे भाजपचे आमदार झाले त्यानंतर मतदार संघात पक्ष संघटन वाढत गेले. गत विधानसभा निवडणुकीतही निसटता पराभव झाला होता.तरीही याठिकाणी भाजपचे संघटन व पक्षीय ताकद अधिक आहे.

# कवी ना. धों. महानोर यांच्या जन्मदिनी गीतांची मैफल

## पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊंडेशनचा उपक्रम

पिंपळे सौदागर । प्रतिनिधी

सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊंडेशनच्या वतीने मराठी साहित्य क्षेत्रातील ख्यातनाम कवी पद्मश्री ना. धों. महानोर यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांनी लिहिलेल्या गीतांची नभं उतरु आलं या मैफलीचे रविवार दि. १५ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय भिसे प्रस्तूत ही मैफल नवी सांगवी येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृहात सायंकाळी पाच ते आठ या वेळेत होणार आहे. ना. धों महानोर यांच्या कन्या सरला महानोर - शिंदे प्रमुख अतिथी तर ह.भ.प. पुरुषोत्तम दादा पाटील हे या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या मैफलीत सतिश इंगळे, धनंजय पवार, मनीषा लताड आणि भारती



न्यायाधीश हे गायक कलावंत महानोर यांची सदाबहार गाणी सादर करणार असून मिहिर भडकमकर यांच्या संगीत संयोजनाखाली अमन सय्यद, विक्रम द्रविड, पद्माकर गुजर, अभिजित भदे आणि पिनाक न्यायाधीश हे कलावंत विविध वाद्यांवर साथसंगत करणार आहेत. सुत्रसंचलनाची जबाबदारी सुप्रसिद्ध कवी आणि गझलकार संतोष घूले सांभाळणार आहेत. मराठी काव्य संगीताचा प्रसार , प्रचार करण्यासोबतच रसिकांची अभिरुची संपन्न करण्याच्या उद्देशाने आयोजित ही मैफल रसिकांसाठी मोफत असून कसलेही शुल्क आकारले जाणार नाही. जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून रसिकांनी या मैफलीचा लाभ घ्यावा असे आवाहन पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय भिसे आणि त्याच्या सहकाऱ्यांनी यांनी केले आहे.

## घोटावडे येथील खून प्रकरणातील पाच जणांना मुठा खिंडीत बेड्या

मुळशी : घोटावडे येथील आमलेवाडीतील (ता. मुळशी) खूनप्रकरणी पौड पोलिसांनी सापळा रचून पाच आरोपींना अटक केली. याप्रकरणी फरार झालेल्या आरोपींना दोनच दिवसांत पोलिसांनी अटक पकडले.

आमलेवाडी येथील टेकडीच्या पायथ्याशी रविवारी (ता.१) रात्री ओंकार भिंगारे याचा आठ जणांनी खून केला होता. याबाबत पोलिसांना आरोपी मुठा गावात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यांनी मुठा खिंडीत सापळा लावून त्यांना पकडले. त्यामध्ये मुख्य आरोपी गणेश कैलास भंडलकर, सनी शाम चव्हाण, अक्षय सुनील ऊर्फ रघुनाथ शेलार, सचिन बापू भंडलकर, परशुराम यल्लाआप्पा कक्षिगीरी (सर्व रा. उरवडे, ता. मुळशी) यांना पोलिसांनी अटक केली आहे.

आरोपींना पकडण्यात पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलिस अधीक्षक सुनील कुमार पुजारी, यांच्या मार्गदर्शनाने पोलिस निरीक्षक संतोष गिरीगोसावी, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर कदम, बालाजी कांबळे, योगेश जाधव, घुले पोलिस हवालदार नितीन रावते, रॉकी देवकाते, रवींद्र नागटिळक, दीपक पालके, सादिक इनामदार, सिद्धेश्वर पाटील, दत्तात्रेय अर्जुन,अनिकेत सोनावणे, साहिल शेख, नवनाथ शिंदे, संदीप दराडे यांच्या पथकाने केली.

# किडनी रॅकेट प्रकरणाच्या चौकशीचा नुसता फार्सच

**पुणे। प्रतिनिधी**

रुबी हॉल क्लिनिकमधील अवैध किडनी रॅकेटप्रकरणी केवळ चौकशी समित्या नेमण्याचा खेळ अद्याप सुरूच आहे. संबंधित प्रकरणानंतर २०२२ मध्ये चौकशी समिती नेमण्यात आली. त्यानंतर जुलै २०२३ मध्ये उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. आता पुन्हा चौकशी समितीचे पुनर्गठण करण्यात आले आहे. समितीमध्ये वारंवार बदल होत असल्याने चौकशी पारदर्शकरीत्या केली जात आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

रुबी हॉलमधील अवैध किडनी रॅकेट प्रकरण एप्रिल २०२२ मध्ये राज्यभरात गाजले. संबंधित प्रकरणाची चौकशी करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्यात आली होती. तेव्हापासून किडनी रॅकेट प्रकरणाच्या चौकशीचा केवळ फार्स सुरू असल्याचे दिसत आहे. प्रकरणानंतर एक वर्षाने १९ जुलै रोजी नव्याने



समिती नेमण्यात आली. ती समिती उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली शासकीय आणि अशासकीय सदस्यांची असल्याचे सांगण्यात आले.

आता समितीची नव्याने फेररचना करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. याआधी या चौकशी समितीचे अध्यक्ष उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश चंद्रकांत भडंग होते. त्यांनी कार्यभार स्वीकारल्यामुळे पुढे चौकशी सुरू ठेवणे शक्य नसल्याचे कळवल्याने आता समितीच्या नवीन अध्यक्षांची नेमणूक करण्यात आली आहे. याआधी उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठण करण्यात आले होते. तसेच, यामध्ये सदस्य म्हणून पूर्वीचेच विविध विभागांचे मिळून ९ सदस्यांचाही समावेश असून, येत्या तीन महिन्यांत समितीला अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे. या प्रकरणात चौकशीच्या अनुषंगाने संबंधित व्यक्तीस चौकशीसाठी बोलावणे, उपाययोजनांची शिफारस करणे, संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची शिफारस करेल व भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी उपाययोजना सुचवणे ही जबाबदारी समितीवर सोपवण्यात आली आहे.

# पुण्यात भररस्त्यावर छेडछाडीचा संतापजनक प्रकार!

## खरेदीसाठी गेलेल्या अभियंता तरुणीची छेड काढून मारहाण, तरुणी जखमी

पुणे । प्रतिनिधी

मागील काही दिवसांमध्ये पुण्यात मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याचं चित्र दिसून येत आहे. खून, दरोडा, बलात्कार यासारखे प्रकार मोठ्या प्रमाणावर होत आहे, नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर संतापाची लाट उसळली आहे, असं असतानाच पुण्यात धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पुण्यात सराईत गुन्हेगाराने भर रस्त्यात एका आयटी अभियंता तरुणीची छेड काढून तिला मारहाण केल्याची घटना, स्वारगेट परिसरात ही घटना घडली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे, या प्रकारानंतर पुण्यात पोलिसांचा धाक उरला आहे की नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

या घटनेत तरुणी गंभीर जखमी झाली आहे. तर आरोपीला स्वारगेट पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. कृष्णा बाबूराव सावंत (वय २५, रा. वांजरखेडा, ता. निलंगा, जि. लातूर) असे गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचं नाव आहे. या धक्कादायक प्रकाराबाबत २१ वर्षीय तरुणीने फिर्याद दिली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी ही मूळची कोल्हापूरची असून, सध्या ती कोंढवा परिसरात राहते. ती आपल्या मैत्रिणीसह लष्कर भागात खरेदीसाठी गेली होती. याचवेळी स्वारगेट परिसरात बस थांब्याजवळ पिडित तरूणी थांबलेली असताना आरोपीने तरुणीची छेड काढली. तरूणीने आरोपीला विरोध केल्यानंतर त्याने तरुणीला मारहाण करण्यास सुरूवात केली. त्यावेळी नागरिकांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कृष्णा बाबूराव सावंत याच्याविरुद्ध यापूर्वी खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी चाकण पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर मारामारी केल्याप्रकरणी खेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. काही दिवसांपूर्वीच आरोपी जामिनावर बाहेर आला आहे. पीडित तरुणी मूळची कोल्हापूरची असून, सध्या कोंढवा परिसरात राहते. ती मैत्रिणीसह लष्कर भागात खरेदीसाठी गेली असताना ही घटना घडली आहे.

# वडगावशेरीत पंकजा मुंडेंसमोर भाजप कार्यकर्ते म्हणाले, आम्ही राष्ट्रवादीचं काम करणार नाही

पुणे । प्रतिनिधी

राज्यात तीन पक्षांचं मिळून महायुती सरकार स्थापन झालं. मात्र, या पक्षातील कार्यकर्ते नेते, आमदार, खासदार यांच्यातील धुसफूस अनेकदा पहायला मिळते, गेल्या काही दिवसांपुर्वी शिवसेना पक्षाचे मंत्री तानाजी सावंत यांचं वक्तव्य असो किंवा मग जागांवरून सुरू झालेली धुसफूस असो. अशातच पुण्याची विधानसभेची जबाबदारी मिळालेल्या भाजप नेत्या पंकजा मुंडे (झरपज्ञरक्षर चींपवश) यांनी आज वडगाव शेरी विधानसभा मतदार संघातील १५० कार्यकर्त्यांची बैठक घेतली. या बैठकीत कार्यकर्त्यांनी आम्ही राष्ट्रवादीचं काम करणार नाही असा इशारा दिला आहे.

लोकसभा निवडणुकीला राष्ट्रवादी अजित पवार गटाने मुरलीधर मोहोळ यांचं काम केलं नाही, असं म्हणत कार्यकर्त्यांनी पंकजा मुंडे यांच्यासमोर वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांची तक्रार केली.



वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघ भाजपकडे ठेवावा अशी देखील मागणी त्यांनी यावेळी केली आहे. अर्जुन जगताप वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष आहेत. भारतीय जनता पार्टीला वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाची जागा मिळावी अन्यथा आम्ही काम करणार नाही असं वक्तव्य अर्जुन जगताप यांनी केलं आहे. त्यामुळे आता निवडणुकीची तयारी करणाऱ्या सुनील टिंगरेंसमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे. त्यामुळे आता ते काय निर्णय घेणार हे पाहणंही महत्त्वाचं ठरणार आहे.

कार्यकर्ते आणि मतदारसंघाचे अध्यक्ष यांच्या तक्रारीवर पंकजा मुंडेंची प्रतिक्रिया

या कार्यकर्ताच्या भावना आहेत. हे नैसर्गिक आहे. प्रत्येक कार्यकर्त्याला वाटत मतदार संघ आपल्याला भेटावा. भाजपाचा कार्यकर्ता शिस्तप्रिय आहे. तो महायुतीचे काम करेल. संघटना म्हणून आमचं काम चालू आहे. जागा वाटपाचा निर्णय वरच्या पातळीवर होईल.१००% सर्व कार्यकर्ताचे समाधान होणार आहे. फार नाराजीचे वातावरण नाही असंही मुंडे यांनी म्हटलं आहे.

## सरसंघचालक घेणार जेजुरीच्या खंडोबाचे दर्शन

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत हे येत्या ४ ते ६ सप्टेंबर दरम्यान विविध कार्यक्रमांसाठी पुणे जिल्ह्यात येणार



आहेत. येत्या गुरुवारी ५ सप्टेंबरला सकाळी ९,३० वाजता श्रीक्षेत्र जेजुरी येथील अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या श्री खंडेरायाचे दर्शन ते घेणार आहेत.

या वेळी श्री मार्तंड देव संस्थानच्या विश्वस्त मंडळातर्फे त्यांचे स्वागत करण्यात येईल, तसेच जेजुरी गडावरील द्वादश मल्हार दर्शन सृष्टीचे भूमिपूजन आणि कोनशिला उद्घाटन डॉ. भागवत यांच्या हस्ते होणार आहे. पुणे शहरात काही अंतर्गत बैठका आणि फक्त निमंत्रितांसाठी असणाऱ्या दोन जाहीर कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत.

## राज्यात ऊसाच्या दरात यंदा 'माळेगाव'च दादा! प्रतिटन ३६३६ रुपये दर; एफआरपीपेक्षा ८०५ रुपये जास्त

माळेगाव - माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२३-२४ या ऊस गळीत हंगामाचा अंतिम दर ३६३६ रुपये प्रतिटन इतका जाहिर केला. त्यामुळे ऊस उत्पादक सभासदांना एफआरपीपेक्षा तब्बल ८०५ रुपये अधिक मिळणार आहेत.

तर गेटकेनधारक शेतकऱ्यांना ३२०० रुपये प्रमाणे अंतिम ऊस बिल आदा होणार आहे. सध्याला एफआरपीपेक्षा जादा रक्कम देण्यात माळेगाव राज्यात प्रथम क्रमांकावर आहे, अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष अॅड. केशवराव जगताप, उपाध्यक्ष तानाजी देवकाते यांनी स्पष्ट केली. 'माळेगाव'ने गतवर्षीच्या हंगामात १३ लाख २७ हजार ९०८ मे. टन ऊसाचे गाळप केले आहे. त्यामध्ये सभासदांचा सुमारे ७ लाख ७७ हजार, तर गेटकेनधारकांचा ५ लाख ५० हजार मे.टन उसाचे गाळप केले होते. तसेच १२.०२ टक्के रिकव्हरीनुसार १५ लाख २० हजार क्विंटल साखर निर्मिती केली होती. सहविजनिर्मितीतून ६ कोटी ९ लाख युनिटची वीजविक्री केली, तर डिस्टलरीतून २ कोटी लिटर इथेनॉलसह विविध प्रकारचे उत्पन्न मिळविले आहे. माळेगावची एफआरपी २८३० रुपये ६७ पैसे प्रतिटन इतकी असून आत्तापर्यंत सभासदांना एफआरपी व २०० रुपये कांडेपमेंटसह ३२०० रुपये दिले आहेत. आता उर्वरित प्रतिटन ४३६ रुपये इतकी समाधानकारक रक्कम आगामी काळात सभासदांना मिळणार आहे, तर गेटकेनधारकांना याआगोदर दिलेले ३००० रुपये वगळता उर्वरित २०० रुपये साधारणतः दिवाळीला मिळणार आहेत.

अजित पवार यांनी बारामतीच्या जन सन्मान सभेत, माझ्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेला माळेगाव कारखाना हा सोमेश्वरच्या ३५७१ रुपये ऊस दरापेक्षा निश्चितपणे अधिकचा दर देईल,' असे सांगितले होते. त्यामुळे माळेगावच आपला पाच वर्षांपुर्वीचा ३४०० रुपये, गतवर्षीचा ३४११ ऊस दर दिल्याचा विक्रम यंदा अजितदादांच्या नेतृत्वाखाली मोडेल का? अशी जबरदस्त चर्चा सर्वत्र होती. अर्थात अजितदादांचा तो शब्द खरा करीत माळेगावचे अध्यक्ष अॅड. केशवराव जगताप यांनी बुधवारी सभासदांना ३६३६ रुपये दर जाहिर केला. तसेच सोमेश्वरपेक्षा ६५ रुपये अधिकचे दिले. यापुढील कालावधीतही माळेगावची उच्चांकी ऊस दराची परंपरा कायम राहील,' अशी ग्वाही संचालक योगेश जगताप, मदनराव देवकाते, अनिल तावरे, नितीन सातव यांनी दिली.

# पीएमआरडीच्या कार्यालयात दक्षिण कोरियाचे पथक

पुणे । प्रतिनिधी

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत विविध विकासकामांची रूपरेषा आखण्यात येत आहेत. या विकासात्मक कामात भागीदारी तत्त्वावर योगदान देण्याच्या दृष्टिकोनातून दक्षिण कोरियाच्या बुसान मेट्रोपॉलिटीन कॉर्पोरेशनच्या (बीएमसी) शिष्टमंडळाने प्राधिकरणाच्या कार्यालयास भेट देत विविध विषयावर अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

दक्षिण कोरियाचे शिष्टमंडळ तीन दिवसाच्या दौऱ्यावर आले असून यादरम्यान ते पीएमआरडीएच्या विकास कामांची माहिती जाणून घेणार आहे. यासह आगामी काळात भागीदारी तत्वावर कुठली विकास कामे करता येऊ शकतात तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचे आदान प्रदानावर विचार करणार आहे.



पीएमआरडीएअंतर्गत सुरू असलेल्या विकास कामांसह आगामी काळातील प्रस्तावित विकासात्मक योजनांसंदर्भात अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला यांनी बुसान कार्पोरेशनच्या शिष्टमंडळाला प्राथमिक माहिती दिली. यात प्रामुख्याने पीएमआरडीएने उभारलेल्या गृहप्रकल्पांसह प्रस्तावित रिंग रोड, विविध विकासात्मक प्रकल्प आणि कामासंदर्भात दक्षिण कोरियाच्या शिष्टमंडळाने सिंगला यांच्याकडून माहिती जाणून घेतली.

यादरम्यान शिष्टमंडळाने महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्यासोबत पीएमआरडीए आणि बुसान मेट्रोपॉलिटीन कॉर्पोरेशनच्या सहकार्याने आगामी काळात कुठली विकास कामे करता येऊ शकतात, याबाबत चर्चा केली. तत्पूर्वी पीएमआरडीएच्या वतीने दक्षिण कोरियाच्या शिष्टमंडळाचे स्वागत केले. यावेळी पीएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, पोलीस अधीक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे, बुसान मेट्रोपॉलिटीन कॉर्पोरेशन नियोजन व्यवस्थापन कार्यालयाचे जिन-वोन जंग, धोरणात्मक नियोजन विभागाचे म्युंग-युन ह्वांग, उपमहाव्यवस्थापक ह्वा-रंग किम, डेप्युटी जनरल मॅनेजर मून-यंग चोई, पीएमआरडीएचे मुख्य अभियंता अशोक भालकर, प्रशासन विभागाचे सह आयुक्त सुनील पांढरे, महानगर नियोजनकार सुनील मरळे,जमीन व मालमत्ता विभागाच्या सह आयुक्त स्नेहल बर्गे, प्रभारी सह आयुक्त हिम्मत खराडे, आदी उपस्थित होते.